MAHMARI 19358/13/1/2000 - TC

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा ठाणे • १९३५

व्ही.पी.एम्.
# दिशा

वर्ष चोविसावे / अंक १ / जानेवारी २०२४

## संपादकीय

### स्क्वेअर किलोमीटर ॲरे

मनुष्याला अनेक बाबींचे कुतूहल असते. त्यातल्यात्यात 'विश्व' हा मानवाच्या कुतूहलाचा एक महत्त्वाचा विषय राहिला आहे. हे विश्व तयार कसे झाले? विश्वातील तारका ऊर्जा निर्मिती कशी करतात? ग्रह आपल्या पासून किती अंतरावर आहेत? त्यांचा आपल्या जीवनावर कसा प्रभाव पडतो? असे अनेक प्रश्न मानवी मनाला भेडसावत असतात. त्यांची उत्तरे शोधण्याचा प्रयत्न माणूस मागील अनेक वर्षांपासून करीत आला आहे. जुन्या काळी कोणतेही उपकरण हातात नसल्याने उघड्या डोळ्यांनी केलेल्या निरीक्षणावर त्याची मदार होती. कालांतराने त्यांच्या हातात दुर्बीण आली. तिच्या मदतीने निरीक्षण करून प्राचीन खगोलशास्त्रज्ञांनी आपली निरीक्षणे नोंदवून ठेवली आहेत. या प्रयत्नातून विश्वाची जुजबी माहिती मिळायला मदत झाली. तरीही विश्वाची अनेक गुपिते गुलदस्त्यातच राहिली.

आपल्या डोळ्यांना जे दिसते तो विद्युत चुंबकीय लहरीचा अगदी लहानसा भाग आहे. ज्यांची तरंग लांबी ४००० ते ७८०० अँगस्ट्राम आहे अशाच लहरी आपल्याला दिसतात. यापेक्षा कमी तसेच जास्त 'तरंग लांबी' असलेले किरण आपल्याला दिसतच नाहीत. त्यामुळे या किरणांमार्फत जी माहिती येते ती आपल्या डोळ्यांना कळतच नाही. यासाठी विशिष्ट उपकरणे विकसित करून आपली बघण्याची क्षमता वाढविण्याचा प्रयत्न सुरू झाला. या प्रयत्नांना यश येऊन काही अल्ट्रावायोलेट आणि इन्फ्रारेड किरणे ग्रहण करू शकतील अशी उपकरणे विकसित करण्यात आली. या उपकरणांनी आपल्याला विश्वाची बरीच माहिती दिली. तरीही विश्वाची गुपिते समजणे शक्य झाले नाही.

विश्वात जे ऊर्जेचे स्रोत आहेत त्यापासून विविध प्रकारच्या विद्युत चुंबकीय लहरी बाहेर टाकल्या जातात. त्यात क्ष-किरण, अतिनील किरण, दृश्य किरण, उष्णता किरण आणि रेडिओ किरण यांचा समावेश होतो. रेडिओ किरणांची तरंग लांबी ही खूपच जास्त असते. त्यामुळे मध्ये येणाऱ्या अडथळ्यांना पार करून ते पुढे जाऊ शकतात. त्याचबरोबर ते अनेक वर्षे वातावरणात तसेच राहतात. म्हणून विश्वाचा अभ्यास करण्यासाठी प्रामुख्याने याच किरणांचा उपयोग करतात. रेडिओ किरणांची मदत घेऊन विश्वाचा अभ्यास करण्यासाठी मुंबईच्या टाटा मूलभूत संशोधन संस्थेत १९६० मध्ये रेडिओ ॲस्ट्रानॉमी (Radio Astronomy) नावाचा एक वेगळा विभाग सुरू करण्यात

(पृष्ठ क्र. २ वर)

(मुखपृष्ठावरून - **संपादकीय**)


आला. या विभागाने दक्षिण भारतातील ऊटी या गावी एक रेडिओ टेलेस्कोप विकसित केला. या यंत्राच्या मदतीने काम करीत असताना या केंद्रातील शास्त्रज्ञांना आणखी जास्त 'तरंग लांबी' असलेले रेडिओ किरण पकडण्याची गरज भासू लागली. ती पूर्ण करण्यासाठी देशभर भ्रमंती करून महाराष्ट्रातील खोडद हे गाव निश्चित करण्यात आले. हे गाव पुणे शहरापासून सुमारे ८० किलोमीटरवर नारायणगावाजवळ आहे. येथे ३० रेडिओ टेलेस्कोप उभारण्यात आले आहेत. प्रत्येकाचा व्यास सुमारे ४५ मीटर असून, इंग्रजी 'वाय' या अक्षरासारखी त्यांची रचना केलेली आहे. हे टेलेस्कोप एक मीटर 'तरंग लांबी' असलेल्या रेडिओ लहरी स्वीकारते. म्हणून त्यांचे नाव जायन्ट मिटरवेव्ह रेडिओ टेलेस्कोप (Giant Meterwave Radio Telescope) असे ठेवण्यात आले. या टेलेस्कोपची देखभाल करण्यासाठी आणि त्यापासून मिळणाऱ्या माहितीचे विश्लेषण करण्यासाठी पुणे विद्यापीठ परिसरात एक स्वतंत्र कार्यालय थाटले आहे. त्याचे नाव 'नॅशनल सेंटर फॉर रेडिओ ॲस्ट्रोफिझीक्स' (National Centre for Radio Astrophysics) असे आहे.

पृथ्वीपासून दूरवर असलेल्या खगोलीय वस्तूंचा अभ्यास करावयाचा असेल तर आणखी मोठ्या आकाराच्या टेलेस्कोपची गरज आहे हे या क्षेत्रात काम करणाऱ्या शास्त्रज्ञांच्या लक्षात आले. एवढा मोठा टेलेस्कोप उभारणे आणि त्याची देखभाल करणे हे एका देशाचे काम नव्हे. म्हणून आंतरराष्ट्रीय पातळीवर स्क्वेअर किलोमीटर ॲरेची (Square Kilometre Array) योजना आखली गेली. या योजनेत तयार होणारा टेलेस्कोप एक चौरस किलोमीटर परिसरात पसरलेला असेल. या प्रकल्पात प्रगत देशाबरोबरच भारताचा देखील समावेश आहे. जगभरातील वेगवेगळ्या ठिकाणी जाऊन दक्षिण आफ्रिका आणि ऑस्ट्रेलिया या दोन देशांतील जागा निश्चित करण्यात आल्या. या दोन ठिकाणी असलेले टेलेस्कोप दोन वेगवेगळ्या प्रकारचे असणार आहेत. दक्षिण आफ्रिकेतील टेलेस्कोप हे जीएमआरटी सारखे म्हणजे डिश अँटेना वापरून बनविले जातील, तर ऑस्ट्रेलिया मधील टेलेस्कोप हे दांड्यादांड्यांनी बनवले जाणार आहेत. या टेलेस्कोपद्वारे मिळणाऱ्या माहितीचे विश्लेषण करण्यासाठी इंग्लंडमध्ये एक स्वतंत्र संस्था उभी करण्यात येणार आहे.

दक्षिण आफ्रिका आणि ऑस्ट्रेलिया या दोन्ही ठिकाणी टेलेस्कोप उभारणीचे काम आता सुरू झाले आहे. त्यासाठी सहभागी देशांकडून निधी गोळा करण्यात येत आहे. जानेवारी महिन्याच्या पहिल्या आठवड्यात भारताने आपला वाटा म्हणून देण्याचे कबूल केले आहे. पुढील ३-४ वर्षांत टेलेस्कोप उभारणीचे काम पूर्ण होईल. मागील काही वर्षांपासून संशोधन क्षेत्रात आंतरराष्ट्रीय सहकार्य वाढीस लागलेले आपण पाहतो. जिनेवा येथील हिग्ज बोसान प्रकल्प हे त्यांचे एक चांगले उदाहरण आहेत. त्याचबरोबर लाईट इन्टरफिरामेट्री ग्रॅव्हिटेशनल ऑब्झर्वेटरी (Light Interferometry Gravitational Observatory) हा एक आंतरराष्ट्रीय प्रकल्प पूर्णत्वाच्या मार्गावर आहे. यातील महत्त्वाची बाब अशी की, या सगळ्या आंतरराष्ट्रीय प्रकल्पात भारताला मानाचे स्थान आहे. मागील सात दशकांत भारताने विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्रात जी भरारी मारली त्याचीच ही पावती आहे. 'नवीन पिढीने या संधीचा पुरेपूर फायदा करून घ्यावा' असे आवाहन मी करू इच्छितो. देशाने संशोधन क्षेत्रात जे नाव कमावले आहे ते टिकवून ठेवायचे असेल तर तरुण मंडळींनी मोठ्या प्रमाणावर संशोधनाची वाट धरणे आवश्यक आहे.

**– डॉ. सुधाकर आगरकर**

•••




**वर्ष पंचविसावे / अंक ७ / जानेवारी २०२४**

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष २८ वे/अंक ७ वा)

**कार्यालय/पत्रव्यवहार**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**
**www.vpmthane.org**
**vpmt1935@gmail.com**

**मुद्रणस्थळ :**
परफेक्ट प्रिण्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
**दूरध्वनी : २५३४ १२९१**
**२५४१ ३५४६**
**Email:perfectprints@gmail.com**

## *अनुक्रमणिका*

| | | |
|---|---|---|
| १) संपादकीय | डॉ. सुधाकर आगरकर | |
| २) दत्त संप्रदायाची ग्रंथ संपदा | सहा.प्रा. सुभाष गं. शिंदे | ३ |
| ३) भारतातील बँकिंग क्षेत्राची प्रगती : सातत्यातून स्थैर्याकडे... | डॉ. अपर्णा कुलकर्णी-धर्माधिकारी | ६ |
| ४) मानवी उत्क्रांतीची वाटचाल | दिलीप नारायण वंडलकर | ९ |
| ५) जय गंगे भागिरथी... 'गंगाशतक'कारांना विनम्र श्रद्धांजली | प्रमोद वसंत बापट | ११ |
| ६) फ्रेंच राज्यक्रांतीत एक प्रमुख व्यक्ती कोन्डोसेचे स्त्रीविषयक विचार | जयंत कुलकर्णी | १३ |
| ७) संगीतायन - नांदी | डॉ. कीर्ती आगाशे | १८ |
| ८) परिसर वार्ता | संकलित | २० |

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून, त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# व्ही. पी. एम. 'दिशा'च्या संदर्भात

- आपण 'दिशा' नियमित वाचा. इतरांनाही वाचायला सांगा.
- हे व्यासपीठ **अभ्यासपूर्ण लेखांसाठी** आहे.
- शैक्षणिक संस्थेने असे मासिक चालवावे, याचे हे एकमेव उदाहरण आहे.
- आपण विचारप्रवृत्त लेख पाठवून 'दिशा'ला सहकार्य करू शकता.
- आपण स्वत: देणगी मूल्य देऊ शकता व इतरांना सांगा.
- आपले देणगी मूल्य द्यायचे राहिले नाही ना, कृपया पडताळून पाहा.
- दिशाच्या संदर्भात देणगी मूल्य, लेख पाठवावयाचे असतील तर ते कार्यवाह, विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, नौपाडा, ठाणे - ४००६०२ या पत्त्यावर पाठवा. ०२२-२५४२६२७० या क्रमांकावर संपर्क साधा.
  Email : vpmt1935@gmail.com
- आपण सार्वजनिक ग्रंथालयाचे संचालक असाल वा असे एखादे ग्रंथालय चालवत असाल, तर आपण सभासद होणे अत्यंत गरजेचे आहे. महाविद्यालये, शाळा यांच्या प्रमुखांनीही आपल्या संस्थेकडून देणगीमूल्य पाठवावे.
- www.vpmthane.org या संकेतस्थळावर 'दिशा'चे जुने अंक आपण पाहू शकता.
- वार्षिक देणगी मूल्याचा रु. ५००/- चा धनादेश 'विद्या प्रसारक मंडळ' या नावाने पाठवावा.
- कृपया वर्गणीदार व्हावे.

- संपादक

# दत्त संप्रदायाची ग्रंथ संपदा

*दत्त संप्रदायाची जी ग्रंथ संपदा आहे त्यामधील ग्रंथांच वाचन करताना एक विशिष्ट शिस्त पाळावी लागते. त्याला काही विशिष्ट नियम असतात. ते समजून घेणे अत्यावश्यक. त्या विषयी या लेखात मार्गदर्शन केलेले आहे. – संपादक*

कुठल्याही धार्मिक संप्रदायाचा प्रसार व प्रचार करण्यासाठी व तो जनमानसामध्ये रुजविण्यासाठी त्या संप्रदायाचे साहित्य व ग्रंथसंपदा असणे महत्त्वाचे ठरते. जर सदर संप्रदायाचे ग्रंथ असतील तर भक्तगण त्यांचे वाचन व पारायण करतात व त्यामुळे आपसूकच त्या संप्रदायाचा प्रसार होण्यास मदत होते व तो लोकांमध्ये लोकप्रिय होतो.

दत्तसंप्रदायातील भक्तगणांनी व सत्पुरुषांनी अशा प्रकारची ग्रंथसंपदा विपुल प्रमाणात निर्माण केली आहे. या संप्रदायातील काही महत्त्वाच्या ग्रंथांची माहिती पुढील परिच्छेदांमध्ये देण्याचा प्रयत्न केला आहे.

इसवीसन १४८० च्या आसपास श्री नृसिंहसरस्वती स्वामींचे भक्त सरस्वती गंगाधर यांनी 'गुरूचरित्र' हा ग्रंथ लिहिला असे अभ्यासकांचे मत आहे. हा ग्रंथ मराठी भाषेत लिहिलेला असून, साधारणपणे यात बावन्न अध्याय आहेत व ओवींची संख्या सात हजार चारशे एक्क्याणव एवढी आहे. गुरूचरित्रात श्रीपाद श्रीवल्लभ व श्री नृसिंहसरस्वती स्वामींच्या विविध लीलांची माहिती दिलेली आहे.

हा ग्रंथ दत्तभक्तांना अतिशय प्रिय असून ते या ग्रंथाला वेदांप्रमाणे पवित्र मानतात. एवढेच नव्हे तर, दत्त संप्रदायात 'गुरूचरित्राला' 'पाचवा वेद' असे देखील म्हणतात. या ग्रंथात वर नमूद केल्याप्रमाणे बावन्न अध्याय आहेत व ओवींची संख्या सात हजार चारशे एक्क्याणव एवढी आहे. हा ग्रंथ मराठीत भाषेत लिहिलेला आहे. परंतु या ग्रंथाचे कर्ते सरस्वती गंगाधर हे मूळचे कानडी भाषिक होते. त्यामुळेच ते असे म्हणतात की, 'मातृभाषा कानडी असून देखील ते मराठीत 'गुरूचरित्र' लिहू शकले याचे कारण त्यांच्यावर श्री नृसिंहसरस्वतींची कृपा होती.'

'गुरूचरित्रात' श्रीपाद श्रीवल्लभ व श्री नृसिंहसरस्वती यांच्या लीलांव्यतिरिक्त दत्तसंप्रदायाशी संबंधित तीर्थयात्रा, विविध व्रतवैकल्ये, औदुंबर व भस्माचे महत्त्व, शिवरात्रीचा उपवास केल्यावर होणारे फायदे, सोमवारच्या व्रताची माहिती, इत्यादी माहिती दिलेली आढळते. अभ्यासक म्हणतात की, सरस्वती गंगाधरांनी 'गुरूचरित्रा' व्यतिरिक्त 'शिवरात्री महात्म्य' हा ग्रंथ व 'श्री नृसिंहसरस्वती स्तोत्र' देखील लिहिलेले आहे. 'शिवरात्री महात्म्य' या ग्रंथात एकूण दोनशे बावन्न एवढ्या ओव्या आहेत. रा. कृ. कामत यांच्यामुळे आपणास प्रमाण मानली गेलेली गुरूचरित्राची प्रत उपलब्ध होऊ शकली असे अभ्यासक म्हणतात.

गुरूचरित्राचे पारायण विविध प्रकारे करता येते. यातील एक प्रकार म्हणजे 'सप्ताह पारायण' हा होय. यात सात दिवस गुरूचरित्राचे पारायण करावयाचे असते व खालीलप्रमाणे अध्याय वाचावयाचे असतात.

अध्याय १ ते ९ – पहिला दिवस

अध्याय १० ते २१ – दुसरा दिवस

अध्याय २२ ते २९ – तिसरा दिवस

अध्याय ३० ते ३५ – चौथा दिवस
अध्याय ३६ ते ३८ – पाचवा दिवस
अध्याय ३९ ते ४३ – सहावा दिवस
अध्याय ४४ ते ५३ – सातवा दिवस

येथे एक मुद्दा नमूद करणे आवश्यक आहे व तो हा की, आपणास एकोणपन्नास, पन्नास, बावन्न व त्रेपन्न अध्याय असलेल्या गुरूचरित्राच्या वेगवेगळ्या प्रती आढळतात.

गुरूचरित्राचे सप्ताहात कसे पारायण करावे याचे नियम आहेत. दत्तगुरूंची भक्तमंडळी हे नियम मनापासून पाळून गुरूचरित्राचे सप्ताहात पारायण करत असतात. हे नियम खालीलप्रमाणे आहेत:

- गुरूचरित्राच्या वाचनाची सुरुवात साधारणपणे शनिवारी करावी व पारायण शुक्रवारी संपवावे.
- गुरूचरित्राचे वाचन करताना आपले मुख पूर्वेकडे वा उत्तरेकडे असावे.
- वाचन ठरलेल्या वेळी व ठरलेल्या जागीच बसून केले पाहिजे. यात बदल होता कामा नाही.
- वाचन करण्यापूर्वी समोर दत्तगुरूंची प्रतीमा वा मूर्ती ठेवावी व यापैकी काही नसेल तर देवाच्या नावाने सुपारी ठेवावी.
- गुरूचरित्राचे वाचन करून झाल्यावर रात्री दत्तगुरूंच्या मूर्तीच्या वा प्रतीमेच्या जवळच पांढऱ्या कपड्यावर वा चटईवर झोपावे.
- सप्ताहात गुरूचरित्राचे पारायण सुरू असताना ब्रह्मचर्य धर्म पाळावा.
- पारायण सुरू असताना फक्त दूध-भाताचाच सात्विक आहार घ्यावा.

अशाप्रकारे वर नमूद केल्याप्रमाणे गुरूचरित्राचे सप्ताहात पारायण केल्यामुळे भक्तांना फलश्रुती प्राप्त होते असे म्हटले जाते.

सप्ताह संपल्यानंतर सुपारीरूपी दत्तगुरूंचे विसर्जन करावे. हे विसर्जन सातव्या वा आठव्या दिवशी करावे. तद्नंतर देवाला नैवेद्य दाखवून आरती करावी व सवाष्ण स्त्रियांना व ब्राह्मणांना भोजन द्यावे.

वरील विवेचनावरून असे लक्षात येते की, दत्तसंप्रदायात या संप्रदायातील विविध सत्पुरुषांनी उपासनेबाबतच्या सांगितलेल्या वा घालून दिलेल्या नियमांचे काटेकोरपणे पालन केले जाते.

गुरूचरित्राचे सप्ताहात पारायण करणे म्हणजे एकप्रकारे स्वतःचे मन व शरीर शुद्ध करण्यासारखे आहे. या संपूर्ण सप्ताहात गुरूचरित्राचे वाचन सुरू असल्यामुळे दत्तगुरूंच्या गोष्टीच मनात घोळत असतात. त्यामुळे इतर कुठले दुष्ट विचार मनात येत नाहीत. तसेच, भगवंताच्या लीलांचे वाचन करत असल्यामुळे मनाला एक वेगळ्या प्रकारची शांती, आनंद व सुख प्राप्त होत असते. यामुळेच मनाचे शुद्धीकरण झाल्यासारखे वाटते. तसेच सप्ताहात ब्रह्मचर्य धर्माचे पालन केल्यामुळे, जमीनीवर झोपल्यामुळे व सात्विक आहार घेतल्यामुळे शरीराचे देखील शुद्धीकरण होते यात वाद नाही.

गुरूचरित्राची एक आरती देखील आहे. वाचकांसाठी व भक्तांसाठी ती खाली देत आहोत :

मूर्तित्रयगुणसारं निर्गुणविस्तारं ।
षड्गुणपारावारं दुर्जनसंहारं ।
भक्तिप्रियदातारं कल्पितपरिपारं ।
मुनिजनमानसहारं निगमागमसारं ।। १ ।।

जय देव जय देव वंदे गुरुचरितं ।
कृपया मानसदुरितं मामुद्धर त्वरितं ।
जय देव जय देव ।। धृ. ।।

---

ज्या चांगल्या बाबी आपण निर्माण केल्या नाहीत, त्या नष्ट करण्याचा अधिकार आपल्याला नाही !

श्रीपाद श्रीवल्लभ यतिवर कृतकृत्यं ।
नरहरि भारति लीला ब्रह्मादिस्तुत्यं ।
कलिमलदाहक मंगलदायक फलनित्यं ।
पारायण देहि मे पुस्तकमपि चित्यं ।। २ ।।

जय देव जय देव वंदे गुरुचरितं ।
कृपया मानसदुरितं मामुद्धर त्वरितं ।
जय देव जय देव ।। धृ. ।।

त्वद्रतलीलासारं श्रुतिसकलाकारं ।
कांडत्रयविस्तारं प्रत्ययलघुकारं ।
कल्पद्रुमफलभारं कल्पित्तदातारं ।
पठणामृतरसधारं भवभयपरिहारं ।। ३ ।।

जय देव जय देव वंदे गुरुचरितं ।
कृपया मानसदुरितं मामुद्धर त्वरितं ।
जय देव जय देव ।। धृ. ।।

अगाध श्रीगुरुकरुणं भूइच्छातरणं ।
ज्ञानामृतरसभरणं जडजीवोद्धारणं ।
भक्त्या कृतमपि स्मरणं तापत्रयहरणं ।
नियमाराधित महिमा मोक्षश्रीवर्णं ।। ४ ।।

जय देव जय देव वंदे गुरुचरितं ।
कृपया मानसदुरितं मामुद्धर त्वरितं ।
जय देव जय देव ।। धृ. ।।

श्रीगुरुकरुणाकृत्यं सिद्धेश्वरगीतं ।
शारदगंगाधरसुतमथितं नवनीतं ।
भाविकभक्तप्रियकर कृतलोककदतं ।
तद्रेतशेषं वांछित सखा हरिहरचित्तं ।। ५ ।।

जय देव जय देव वंदे गुरुचरितं ।
कृपया मानसदुरितं मामुद्धर त्वरितं ।
जय देव जय देव ।। धृ. ।।

गुरूचरित्राचे दत्तभक्तांच्या मनात अनन्यसाधारण महत्त्व आहे. या ग्रंथात दत्तगुरू त्यांच्या भक्तांची काळजी कशी घेतात व त्यांना आई सारखे प्रेम देऊन अमृतरूपी गोडवा प्रदान करतात असे सांगणाऱ्या ओव्या आहेत. सदर ओव्या खालीलप्रमाणे आहेत:

ऐसें सिद्धांचे वचन ऐकोनी । नामधारक लागे चरणीं ।
म्हणे बाळाची आळी पुरोवनी । कृतकृत्य केले गुरूराया ।।९६।।

श्रोते म्हणतीं वंदूनी पायीं । श्रीगुरू केली बहु नवलाई ।
बाळका अमृत पाजी आई । तैसें आम्हा पाजिलें ।।९७।।

(क्रमशः)

**– सहा. प्राध्यापक सुभाष गंगाराम शिंदे**
उपप्राचार्य व इतिहास विभागप्रमुख
विप्रमंचे के. ग. जोशी कला व ना. गो. बेडेकर
वाणिज्य महाविद्यालयाचे (स्वायत्त),
ठाणे (पश्चिम) – ४००६०१
भ्रमणध्वनी : ९८२०३२८२२६
Email : subhashinscotlandgmail.com

•••

दिशा नियमित वाचा.
आपली मते जाणून घेण्यास आम्ही उत्सुक आहोत.

आईच्या डोळ्यांतील रागाच्या पाठीमागे वात्सल्याचे सागर उचंबळत असतात.

# भारतातील बँकिंग क्षेत्राची प्रगती : सातत्यातून स्थैर्याकडे...

*भारताची आर्थिक क्षेत्रामध्ये विजयी घोडदौड सुरू आहे. यामध्ये बँकिंग क्षेत्राचा फार मोठा वाटा आहे. आर्थिक विकासात बँकिंग क्षेत्राच्या योगदानावर प्रकाश टाकणारा डॉ अपर्णा कुलकर्णी- धर्माधिकारी यांचा लेख- संपादक*

सालाबादप्रमाणे याही वर्षी डिसेंबर महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात रिझर्व बँकेने भारतातील बँकिंग व बिगर बँकिंग वित्तीय संस्थांच्या प्रगतीचा अहवाल प्रसिद्ध केला. साधारणपणे १९५६ पासून रिझर्व बँक असा अहवाल दरवर्षी प्रसृत करते, ज्यामध्ये त्या त्या वर्षासाठी भारतीय बँकिंग क्षेत्रातील वित्तीय संस्थांच्या कार्याचा व प्रगतीचा आढावा घेतलेला असतो. या अहवालाला 'बँकिंग क्षेत्रातील कल व प्रगती अहवाल' – 'रिपोर्ट ऑन ट्रेंड्स अँड प्रोग्रेस ऑफ बँकिंग इन इंडिया' असे म्हटले जाते. भारताच्या संदर्भात बँकिंग क्षेत्र हे निधी उभारणी आणि पतपुरवठा या दोन्हींच्या संदर्भात महत्त्वाची भूमिका बजावते. फार पूर्वीपासून बँका या संस्थात्मक पतपुरवठादार म्हणून भारताच्या वित्तीय क्षेत्रात महत्त्वाची भूमिका बजावत असताना दिसून येतात. तसेच १९९१ नंतर घडून आलेल्या आर्थिक सुधारणांच्या परिणामी बिगर बँकिंग वित्तीय संस्था देखील पतपुरवठ्यामध्ये कळीची भूमिका बजावत असल्याचे दिसून येते. म्हणून आजच्या घडीला बँकिंग क्षेत्रातील विविध प्रकारचे कल आणि बँकिंग क्षेत्राच्या प्रगतीचा आढावा घेत असताना बिगर बँकिंग वित्तीय संस्थांचा विचार करणे क्रमप्राप्त ठरते. याच अनुषंगाने रिझर्व बँक अशा प्रकारच्या अहवालामध्ये व्यावसायिक बँका, सहकारी बँका आणि इतर वित्तीय संस्था यांच्याकडून प्राप्त झालेल्या विदेचा अभ्यास करून, त्या त्या वर्षासाठीचा बँकिंग क्षेत्राचा प्रगती अहवाल सादर करते. या अहवालामध्ये एका वित्तीय वर्षात बँका आणि तत्सम संस्थात्मक पतपुरवठा करणाऱ्या संस्थांकडून होणारी पतपुरवठ्यातील वाढ, बँकांकडील ठेवींमध्ये होणारी वाढ, बँकांना मिळणारे परतावे, वित्तीय जोखीमा आणि सध्याच्या परिस्थितीत महत्त्वाचे असणारे दोन घटक म्हणजे वित्तीय तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्तेच्या जोरावर बँकिंग क्षेत्रात नव्याने येऊ घातलेले बदल आणि त्याचा सर्वच घटकांवर होणारा परिणाम यासंबंधी विस्तृत विवेचन केलेले आहे. रिझर्व बँकेच्या आकडेवारीनुसार भारतातील बँकिंग क्षेत्र हे साधारणपणे व्यावसायिक बँका व सहकारी बँका अशा प्रकारच्या संस्थात्मक पतपुरवठादार वित्तीय संस्थांवर मोठ्या प्रमाणावर अवलंबून असून, बँकिंग क्षेत्राचा इतिहास लक्षात घेता या संस्था वित्तीय आणि आर्थिक विकासात मोलाची कामगिरी पार पाडतात. बँकांकडून होणारा पतपुरवठा हा मुख्य अर्थव्यवस्थेला चालना देणारा ठरतो व म्हणून पतपुरवठ्याची साखळी नियमित असणे हे एकूणच अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने महत्त्वाचे ठरते. यावर्षीच्या अहवालातून असे लक्षात येते की, कोविड नंतरच्या काळात भारतातील बँकिंग क्षेत्र हे पुन्हा उभारी घेण्याच्या अवस्थेत असून बँकांबरोबरच बिगर बँकिंग वित्तीय व्यवस्था देखील वित्तीय दृष्ट्या स्थिर आहेत आणि त्यांची नफा-क्षमता ही सातत्याने वाढत आहे. या अहवालातील आकडेवारीनुसार भारतातील बँकांचा संयुक्त ताळेबंद १२.२% नी वाढला असून, बँकांचा क्षेत्रीय पतपुरवठा हा प्रामुख्याने सेवा क्षेत्राला होत आहे व त्यातून बँकिंग क्षेत्राची नफा क्षमता वेगाने वाढत

आहे. बँकांकडे असणाऱ्या ठेवींचे प्रमाण देखील लक्षणीयरित्या वाढत असून, वित्तीय जोखीमांचा सामना करण्यासाठी बँकिंग संस्थांकडे बऱ्यापैकी भांडवल साठा असून, आर्थिक दृष्ट्या जोखमीच्या असणाऱ्या कर्जपुरवठ्याला तोंड देण्यासाठी बँकिंग क्षेत्राकडचे भांडवल हे साधारणपणे १६.८% या वेगाने मागील वर्षात वाढले आहे.

अत्यंत महत्त्वाची गोष्ट म्हणजे, मागच्या काही वर्षांत बँकांकडील एनपीए म्हणजेच अनुत्पादक मालमत्तांचा प्रश्न हा खूप जटिल बनला होता. परंतु मागच्या दोन वर्षांत अशा अनुत्पादित मालमत्तांची टक्केवारी वेगाने घसरत असून २०१८ – १९ ते २०२२ – २३ या काळात एकूण अनुत्पादित मालमत्तांचे प्रमाण ३.२% एवढेच राहिले आहे, तर त्याच बरोबरीने बँकांचे व्याज नफा गुणोत्तर हे वेगाने वाढत आहे. रिझर्व बँकेने अनुत्पादित मालमत्तांचे प्रमाण कमी करण्यासाठी उचललेली महत्त्वाची पाऊले व त्यासाठीची निश्चित अशी ध्येयधोरणे यांचा परिणाम म्हणून भारतीय बँकिंग क्षेत्र अनुत्पादित मालमत्तांच्या विळख्यातून हळूहळू मुक्त होताना दिसत आहे. याचाच परिणाम म्हणून मागच्या पूर्ण दशकातली ही सर्वात वेगवान घट दिसून आली आहे. अनुत्पादित मालमत्तांचे प्रमाण कमी होणे म्हणजेच बँकांची नफा क्षमता वाढणे आणि त्यांच्याकडील भांडवलाचा पाया मजबूत होणे होय.

बिगर बँकिंग वित्तीय संस्थांच्या जोमाने वाढलेल्या विस्तारामुळे बँकिंग क्षेत्रामध्ये स्पर्धा वाढली असून, बिगर बँकिंग वित्तीय संस्थांचे मुख्य प्रवाहातील बँकांवरचे निधीसाठीचे अवलंबन हा रिझर्व्ह बँकेसाठी कळीचा मुद्दा आहे. या अहवालातील निरीक्षणानुसार बिगर बँकिंग वित्तीय संस्था मुख्य प्रवाहातील बँकांवर अनेक गोष्टींसाठी अवलंबून असतात आणि हे अवलंबन आणि त्यांच्यातील अंतर्गत व्यवहार याचा साखळी परिणाम वित्तीय संस्थेवर दिसून येतो. या अनुषंगाने रोखतेची कमतरता जाणवल्यास संपूर्ण वित्तीय व्यवस्थेला त्याचा फटका बसण्याची शक्यता असते. म्हणूनच या अहवालानुसार बिगर बँकिंग वित्तीय संस्थांनी स्वतःची संसाधने उभी करणे व त्यांचे मुख्य प्रवाहातील बँकांवर असणारे अवलंबन कमी करणे या उद्देशाने प्रयत्न करायला हवेत. ज्यामुळे बँकिंग क्षेत्राशी संबंधित असणाऱ्या जोखीमा कमी होतील व बँकिंग क्षेत्राची वाढ होण्यास मदत होईल. हा अहवाल असेही निरीक्षण नोंदवतो की, बँकिंग क्षेत्राची अशा प्रकारे होणारी वाढ नजीकच्या काळात महागाईसारख्या समस्यांमुळे कुंठीत होऊ शकते. तसेच जोमाने वाढणाऱ्या वित्तीय तंत्रज्ञानामुळे आणि कृत्रिम बुद्धिमत्तेच्या प्रसारामुळे बँकांच्या व्यवहारात सायबर गुन्ह्यांचे वाढते प्रमाण आणि कमकुवत अशा प्रकारचे जोखीम व्यवस्थापन यावर लक्ष केंद्रित करावे लागणार आहे. अन्यथा बँकांच्या कामगिरीवर याचे दूरगामी परिणाम संभवतात. बँकिंग क्षेत्रावरील खातेदारांचा आणि इतर घटकांचा विश्वास टिकवून ठेवणे आणि त्याद्वारे वित्तीय विकासातून आर्थिक विकास साध्य करणे हे उद्दिष्ट डोळ्यांसमोर ठेवून बँकिंग क्षेत्राला नजीकच्या काळात पावले उचलावी लागणार आहेत. म्हणूनच बँकांकडे असणारा भांडवलाचा पाया मजबूत असावा, बँकांचे जोखीम व्यवस्थापन तंत्र हे अद्ययावत असावे आणि सायबर गुन्हे टाळण्यासाठी बँकिंग प्रणाली सुदृढ असावी असा रिझर्व बँकेचा नेहमीच आग्रह राहिला आहे.

याबरोबरच रिझर्व बँकेने बँकिंग वित्तीय संस्थांना त्यांच्या ग्राहक सेवांच्या गुणवत्तेत सुधारणा करण्यासाठी सल्ला देखील दिलेला आहे. अंतिमतः ग्राहकांच्या सेवेतील गुणवत्तेवरच बँकिंग क्षेत्राचे भवितव्य अवलंबून असते म्हणूनच ठेवीदार आणि इतर ग्राहकांच्या वित्तीय गरजा पूर्ण करण्यासाठी बँकांनी अधिक तत्पर असणे रिझर्व

बँकेला अपेक्षित आहे. त्या अनुषंगाने या अहवालात काही शिफारशी देखील मांडण्यात आलेल्या आहेत. भारतीय अर्थव्यवस्थेचा विचार करता रिझर्व बँक ही केवळ बँकांसाठीची नियामक संस्था नाही, तर ती पतधोरण ठरवणारी सर्वोच्च संस्था देखील आहे. त्यामुळे बँकिंग क्षेत्राचे नियमन आणि मौद्रिक धोरण यांचा मेळ घालताना रिझर्व बँकेला बँकिंग क्षेत्राचा विकास आणि पतपुरवठ्याचे नियंत्रण या दोन्ही उद्दिष्टांची पूर्तता करावी लागते. या दृष्टीने विचार करता रिझर्व बँकेच्या अंदाजानुसार २०२४ च्या मध्यानंतर जागतिक आर्थिक घडामोडींच्या परिणामी आर्थिक विकासाला भारतासारख्या देशात काही प्रमाणात खीळ बसू शकते आणि त्याचा परिणाम म्हणून महागाई दर वाढू शकतो. वाढता महागाई दर, कमकुवत नफा क्षमता आणि वाढलेल्या वित्तीय जोखीमा यांचा परिणाम म्हणून बँकिंग क्षेत्राला अनेक समस्यांना तोंड द्यावे लागू शकते. म्हणून रिझर्व बँकेचे मौद्रिक धोरण हे सावधगिरीचे असून, पुढच्या किमान दोन ते तीन वर्षांसाठी रिझर्व बँक मौद्रिक आकुंचनाकडे कल दाखवेल असा अंदाज आहे. संकुचिततावादी मौद्रिक धोरणामुळे बँकांची पतपुरवठा क्षमता आणि रोख राखीव दराचे व्यस्त प्रमाण यामुळे सध्या दिसून येणारी पतपुरवठ्यातील वाढ पुढील काळात टिकून राहील अशी शाश्वती नाही म्हणूनच बँकांनी त्यांच्या भांडवलाचा पाया अधिकाधिक मजबूत करणे, वित्तीय जोखीमा कौशल्याने हाताळणे आणि नफा क्षमता टिकवून ठेवणे याकडे अधिक लक्ष द्यावे असे हा अहवाल सांगतो.

बँकांच्या नफा क्षमतेबरोबरच रिझर्व बँकेने बँकांच्या कामगिरीवर परिणाम घडवणाऱ्या सायबर गुन्ह्यांची देखील या अहवालात दखल घेतलेली आहे. रिझर्व बँकेच्या निरीक्षणानुसार या वित्तीय वर्षातील पहिल्या तिमाहीत बँकिंग व्यवहारातील घोटाळ्यांची संख्या १४४८३ एवढी होती, ज्यातून २६४२ कोटी रुपयांची अफरातफर झाल्याचे दिसून येते. अर्थात मागच्या आर्थिक वर्षाच्या तुलनेत हे प्रमाण कमी असले तरी देखील बँकांना हे प्रमाण कमी करण्यासाठी लक्ष द्यावे लागणार आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या तंत्रज्ञानाच्या मदतीने वित्तीय संस्थांनी सायबर गुन्हे टाळून विदा सुरक्षा साध्य करण्यासाठी व बँकिंग क्षेत्र अधिकाधिक कार्यक्रम होण्यासाठी यंत्रणा उभी करावी आणि ग्राहक सेवेतील गुणात्मक वाढ होण्यासाठी प्रयत्न करावेत. जागतिक वित्तीय यंत्रणेच्या परिप्रेक्षात भारताच्या बँकिंग क्षेत्राचा विचार करता १९९१ साली झालेल्या आर्थिक सुधारणा, त्या नंतर आलेली वित्तीय संकटे आणि नजीकच्या काळात येऊन गेलेले कोविड महामारीचे संकट यातून भारतीय बँकिंग व्यवस्थेने अनेक चढ-उतारांचा सामना केलेला आहे आणि तरीही बँकिंग क्षेत्र सातत्य, स्पर्धाक्षमता आणि नवीन तंत्रज्ञानाला आपलेसे करण्याची मानसिकता यातून वित्तीय स्थैर्य राखून सातत्याने प्रगती करत आहे अशी समाधानकारक बाब या अहवालातून पुढे येत असली तरी देखील रिझर्व बँकेच्या मौद्रिक धोरणांचे परिणाम, चलन दर व महागाई दर यातील स्थित्यंतरे, जागतिक जोखीमांचे अस्तित्व आणि विदेशी वित्तीय संस्थांच्या अस्थिर निर्णयांचे धक्के यातून भारतीय बँकिंग क्षेत्राला भविष्यात वाटचाल करण्यासाठी अनेक धोरणात्मक बदल करावे लागतील व सुधारणांच्या मार्गाने बँकिंग क्षेत्र अधिकाधिक स्पर्धात्मक आणि कार्यक्षम होईल याकडे लक्ष द्यावे लागणार आहे.

**डॉ. अपर्णा कुलकर्णी- धर्माधिकारी**

•••

***दिशा संपर्क दूरध्वनी***

***०२२-२५४२ ६२७०***

# मानवी उत्क्रांतीची वाटचाल


*उत्क्रांतीच्या तत्त्वानुसार मानवी विकासाचे विविध टप्पे आणि आत्ताच्या उन्नत स्थितीनंतर पुढे काय? यांचा वैज्ञानिक सत्यतेच्या आधारावर आढावा या लेखात घेण्यात आला आहे. - संपादक*

मानवी आयुष्याचा काळ जेमतेम ७० ते ८० वर्षांचा आहे. जास्तीत - जास्त १०० वर्षे धरली तरीही त्याच्या दृष्टीने हजारभर वर्षे म्हणजे फार पुरातन काळ होतो. आपले घर कसे होते, कोणी बांधले, गाव कधी वसले, त्या आधी जंगल होते काय? - या प्रश्नांची तरी सामान्य माणूस आपल्या वडील, आजोबा, पणजोबांकडे चौकशी करतो, त्यात आस्था दाखवतो. अगदी तशीच आस्था विचारवंतांनी आणि शास्त्रज्ञांनी दाखवली आहे. आज आपण जसे आहोत तसेच काही कोटी वर्षांपूर्वी होतो काय? आपण 'ॲडम आणि ईवचे वंशज आहोत काय? आदी प्रश्नांनी त्यांना भंडावून सोडले. अनेकांनी या कोड्याचे उत्तर शोधण्याचा प्रयत्न केला. सरतेशेवटी उपलब्ध पुरावे, सूक्ष्म निरीक्षण यांची सांगड घालून तर्कशुद्ध शास्त्रीय उपपत्ती अशा स्वरूपात चार्ल्स डार्विनने १८५४ साली 'ऑन द इव्होलूशन ऑफ स्पेसीज' या ग्रंथात त्याची मते मांडली. त्यानुसार उत्क्रांतीच्या वाटचालीत प्राण्यांच्या मूळ शरीर-रचनेत गरजेप्रमाणे बदल होत त्यांना आजचे स्वरूप प्राप्त झाले, असे नमूद केले.

असेच बदल माणसाबाबत करोडो वर्षांपासून घडत गेले आणि एप, गोरिल्ला, चिंपांझी असे होत होत आजचा मानव तयार झाला. आणखी अभ्यास केला असता समजून येते की, गोरिल्ला आणि चिंपांझी या माकडांच्या रक्तातील प्रथिने, हिमोग्लोबीन आणि डी.एन.ए. यांचे माणसांच्या रक्तातील याच घटकांशी मोठ्या प्रमाणावर साम्य आहे. यावरूनच वरील तिन्ही शाखा सुमारे ४० ते ५० लाख वर्षांपूर्वी एकाच पूर्वजापासून जन्मल्या असाव्यात, असा अंदाज व्यक्त केला जातो. आजचा सुधारित मानव तयार होण्याचा कालावधी सुमारे १० हजार वर्षांपूर्वीचा होता. हा मानवी संस्कृतीच्या उदयाचा आणि प्रगतीचा कालखंड. याच काळात माणूस शिकार आणि शेती शिकला, पशुपालन करू लागला, त्याने धातूंचा शोध लावला आणि विविध स्वरूपाची ऊर्जा तो वापरू लागला.

### ऑस्टेलोपिथिकस अफेरेनिस ते होमोसेपियन्स पर्यंतची मानवी उत्क्रांती

उत्खननात सापडणाऱ्या जीवाश्मांच्या मदतीने मानवाच्या उत्क्रांतीतील वाटचालीच्या खुणा धुंडाळाव्या लागतात. सर्वात प्राचीन जीवाश्म आहे 'रामापिथेकस'चा. भारत आणि पूर्व आफ्रिकेत आढळून आलेल्या अवशेषांवरून आजच्या माणसाशी साम्य सांगणाऱ्या शारीरिक खुणा रामापिथेकसमध्ये होत्या हे लक्षात येते. त्याचा काळ होता सुमारे १.२ कोटी वर्षांपूर्वीचा.




ऑस्टेलोपिथिकस अफेरेनिस ते होमोसेपियन्स पर्यंतची मानवी उत्क्रांती

त्यानंतर भेटतो ३५ लाख वर्षांपूर्वी वावरणारा ऑस्टेलोपिथिकस अफेरनिस. मागच्या दोन पायांवर उभे राहून ताठ चालणे हे वैशिष्ट्य या पूर्वजात पूर्ण रुजलेले आढळते. मात्र मेंदूचा आकार अद्याप लहानच होता, तर जबडा आणि दातांचा आकार मोठा होता. ऑस्टेलोपिथिकस ऑफिकन्स, ऑस्टेलोपिथेकस शेबॉस्टस असे बदल होत होत १० लाख वर्षांपूर्वी 'होमोसेपियन्स' या आत्ताच्या मानवी पूर्वजाचा जन्म झाला.



होमो इरेक्टस ही ऑस्टेलोपिथिकस आणि आजचा मानव यामधली पायरी होती. आजचा मानव म्हणजे होमो सेपियन्स. जीवाश्म स्वरूपात हा होमो सेपियन्स आपल्याला भेटतो साधारणतः ५ लाख वर्षांपूर्वीच्या काळात !

मेंदूच्या आकारात वाढ होत गेली. सुरुवातीला होमोसेपियन्स निऍन्डरथलच्या कवटीची हाडे जाड होती आणि कपाळ अरुंद होते. हे सगळे शारीरिक बदल होत आजच्या स्वरूपातील मानव सुमारे ४० हजार वर्षांपूर्वीच्या अवशेषांमध्ये आढळतो! दहा हजार वर्षांपूर्वीच्या सुधारित मानवाची जागा आज विकसित मानवाने घेतली ती बुद्धीचातुर्याच्या भरोशावर. पण-पण, आजच्या घडीला कृत्रिम बुद्धिमत्तेने त्याच्या मूळ बुद्धीवर कुरघोडी केल्याचे दिसून येते. खरोखरचा मेंदू तयार करण्याइतपत कृत्रिम बुद्धीने मजल मारली आहे! तेंव्हा आता मानवी मेंदूची गरज संपल्यागत आहे. डार्विनच्या सिद्धांतानुसार एखाद्या गोष्टीचा वापर होत नसेल तर ती हळूहळू नष्ट पावते.

वैज्ञानिक सिद्धांतानुसार "Every system has some Entropy. When it increases, the system moves from Order to Disorder and Vice - versa when it decreases, the system moves from Disorder to Order. As of now, our universe is traveling towards more complicated state i. e. from Order to Disorder. Is the law of Entropy true or otherwise in respect of our motherearth."

थोडक्यात, आपल्या पृथ्वीचा विकास होतो आहे पण तो भ्रामक म्हणजे साध्यासोप्या मार्गावरून. आपण अधिक जटिलतेकडे झेपावत आहोत. त्याला परत साध्या मार्गावर आणायचे असेल तर एंट्रॉपी कमी होणे आवश्यक आहे. एंट्रॉपी कमी होणे याचा अर्थ पृथ्वीची शक्ती कमी होणे. आता "Energy can not be created nor can it be destroyed" हा सिद्धांत समजून घेतला तर एखाद्या प्रचंड विनाशाशिवाय पृथ्वीची एंट्रॉपी कमी होणार नाही, हे सत्य आहे. इथेच खरी मेख आहे. त्यामुळे आजच्या मानवाचे भवितव्य ठरवणे फक्त त्याच्याच हातात आहे !

**- दिलीप नारायण वंडलकर**
४, नरकेसरी सोसायटी, उज्ज्वलनगर,
नागपूर - ४४००२५
मो.नं.: ९८३४६३६६५५
इ-मेल- wandalkardilipgmail.com

●●●


**दिशासाठी**

***आपले लेखनसहकार्य अपेक्षित आहे. आपल्या अध्ययन-अध्यापन विषयांतील नवीन घडामोडी, नवीन ज्ञानक्षेत्रे यांबाबत सातत्याने लेखन करणे हे अध्यापनात साहाय्यकारी ठरणारे आहे.***

***तरी, आपणाकडून लेखन अपेक्षित करीत आहे.***
***- संपादक***

# जय गंगे भागिरथी...
# 'गंगाशतक'कारांना विनम्र श्रद्धांजली

*हिंदी भोजपुरी साहित्यातील प्रख्यात कवी लेखक गीतकार पंडित हरिराम द्विवेदी यांचे सोमवार दिनांक ८ जानेवारी २०२३ रोजी काशी येथे निधन झाले. त्यांना साहित्य अकादमीचा 'भाषा सन्मान' 'राहुल सांकृत्यायन पुरस्कार' इत्यादी मानाचे पुरस्कार मिळाले होते. त्यांच्या साहित्यिक कार्यावर प्रकाश टाकणारा ज्येष्ठ साहित्यिक श्री प्रमोद बापट यांचा लेख- संपादक*



महिन्याभरापूर्वी आजच्या दिवशी गंगातीरी बसलो होतो. आधल्या दिवशी डेहराडून विमानतळावरून हरिद्वारकडे जाताना वाटेत एक उपनदी ओलांडून गेलो होतो. नाव गंमतीदार वाटलं.. साँग ! नदीला थेट 'गाणं' अशी जणू कुणी साद घातली असावी. कदाचित स्थानिक लोकभाषेत काही वेगळा उच्चार असेल, अर्थही..

वाटेवर काळोख होता. काही दिसणं संभवतच नव्हतं. पण भ्रमंतीला जायचं ठरल्यापासूनच गंगेचे वेध लागले होते. त्यामुळे वेडी आशा होती कुठेतरी गंगेचं पात्र सामोरं येईल, त्यात रात्रीची वेळ असल्यामुळे पाण्यात उतरलेलं आकाश दिसेल, लाजत, संकोचत भिजणाऱ्या चांदण्या दिसतील!

पण तसं काहीही घडलं नाही. सामोरं तर नाहीच, पण उजव्य-डाव्या बाजूंनी गंगामाईने दर्शन दिलं नाही. किमान तिच्या लहरींचा खळाळ कानावर पडेल म्हणून वेध घेत होतो. पण तोही नाही.

पण ही 'साँग नदी' सांत्वन करीत आली. तिला पाहात होतो, पण मनात गंगामाई वाहात होती.

दुसऱ्या दिवशी जिथे राहिलो होतो त्या काशी मठाच्या एका बाजूला गंगामाईचे पात्र भिडलं होतं. सकाळी तिचं दर्शन झालं. आणि मग पुढचे तीन दिवस गंगासहवास मिळतच राहिला हरिद्वार, ऋषिकेश दोन्ही तीर्थस्थानी दर्शन, सायं आरती झाली.

आज हे सर्व प्रकर्षाने आठवलं ते मात्र एका कवीच्या दुःखद वियोग-वार्तेमुळे.

हिंदी आणि भोजपुरी... खरं तर क्रम चुकला, भोजपुरी आणि हिंदी भाषेतील ज्येष्ठ कवी पं. हरिराम द्विवेदी ह्यांचं परवा.. सोमवारी दि. ८ जानेवारीला वाराणसी नगरीत दुःखद निधन झालं. वय ८७ होतं, पण कविराजांच्या ते गावी नव्हतं. अखेरपर्यंत कवी लिहिता.. गाता होता. खरं तर कालच बातमी वाचनात यायला हवी होती, पण हुकली खरी. मराठी वृत्तपत्रात पहायला मिळाली नाही, पण आज हिंदी आणि इंग्रजी वृत्तपत्रात वाचायला मिळाली. थोडं कवी-चरित्रही वाचायला मिळालं.

पं. हरिराम द्विवेदी ह्यांचा 'लोकसाहित्याचे मर्मज्ञ' असाही लौकिक आहे. त्यांनी हिंदी आणि भोजपुरी... पुन्हा क्रम चुकलो;.. भोजपुरी आणि हिंदी अशा दोन्हीही भाषांमध्ये लेखन केलं आहे.

हा क्रम महत्त्वाचा आहे. कारण ते कवीचं मत, आग्रह आहे. तोही अशासाठी की, त्यातून कवीच्या सृजन-प्रक्रियेचा बोध व्यक्त होतो. पंडितजी एका मुलाखतीत म्हणाले होते की, 'भोजपुरीत मी लिहितो

असं म्हणणार नाही, इतकं ते सहज होऊन जातं. हिंदीत मात्र मी विचारपूर्वक लिहितो.'

प्रामुख्याने काव्यलेखन करणाऱ्या पं. हरिरामजींना 'साहित्य अकादमी'सारख्या अत्यंत प्रतिष्ठेच्या पुरस्कारानं त्यांना गौरविण्यात आलं होतं.

पंडितजीनी एका संकल्पनेचा छान उलगडा केलेला ऐकला. ते म्हणाले, 'मी लोकसाहित्य, लोकसंस्कृतीचा विद्यार्थी आहे. पण एक लक्षात घ्या की, लोक म्हणजे 'फोक' (folk) नव्हे. मी लोकसाहित्य अभ्यासतो, मांडतो ते लोकरीती, लोकाचार म्हणून. ते मनोरंजन नाही, तर ते जगणं आहे. केवळ नाच, गाणी नाहीत; तर जीवनातील सर्वच अभिव्यक्ती ज्या अधिष्ठानावर उभी असते ते ते सारे 'लोक' ह्या शब्दांत घट्ट बांधून ठेवले आहे. त्याचा सर्वकाळ उलगडा होत राहिला आहे. तो राहणार. कारण तो जिवंत मनांशी, जनांशी निगडित आहे. आणि हे लक्षात घेतलं की ह्या सर्व जीवनवृक्ष्यांचं पोषण एकाच समान धारेवर झालेलं दिसेल. ते उमजणं महत्त्वाचं...

अगदी अशीच तलस्पर्शी मांडणी नुकतेच दिवंगत झालेले ज्येष्ठ विचारवंत आणि लोकवेदाचे भाष्यकार पद्मश्री डॉ. प्रभाकर मांडे करीत असत.

हे ऐकलं आणि सर्व भारतीय मनांचे पोषण करणारा जलसंचय आठवू लागलो. मनातला खळाळ ऐकू लागलो. तो गंगेचा आहे असं जाणवलं. पूर्ववाहिनी गंगामाईने जरी पश्चिम-पूर्व भू-भाग भिजवला असला तरी दक्षिणोत्तर पसरलेल्या भरतखंडावर तिचा प्रभाव आहे. तिच्याविषयी पूज्यभाव आहे.

महिन्यापूर्वीच्या गांगेय दिवसात रमून गेलो. ह्या महिन्यातच नव्हे तर वर्षभर गंगागौरवाचा उद्घोष करायला मिळाला होता. निमित्त होतं ज्येष्ठ नाटककार विद्याधर गोखले ह्यांच्या जन्मशताब्दीचं. गोखले अण्णांवर पाच-सहा वेळा बोलायला मिळालं. लिहिलंही अनेकदा. आणि अण्णांवर बोलायचं तर 'पंडितराज जगन्नाथ'वर बोलणं अपरिहार्य आहे. आणि मग ओघानंच गंगालहरीही खळाळत राहते. गतवर्षी दि. ४ जानेवारीला जन्मशताब्दीच्या आरंभाला अमरावतीत बोललो होतो आणि ह्या वर्षीच्या ४ जानेवारीला सांगतेच्या निमित्ताने अखेरचं साहित्य अकादमीच्या परिसंवादात बोललो.

आज पं. हरिराम द्विवेदी ह्या कविश्रेष्ठाच्या निधनवार्तेने ती गंगाधारा पुन्हा वाहती केली.

पंडितजींच्या रचनासंपदेत एक महत्त्वाचे कविताधन आहे. 'गंगाशतक!' भोजपुरी भाषेचं सारं ललित लडिवाळपण घेऊन ते प्रदीर्घ काव्य उदयाला आलं आहे. चार-चार चरणांचे शंभर चौक असं त्या रचनेचं स्वरूप आहे. आज तेही वाचायला मिळालं आणि पाण्यात प्रतिबिंब दिसावं तशा काही भावानुवादाच्या ओळी मनात गुंजत आल्या.

हे काही आरंभीचे चौक नाहीत. पण गंगातीरावर पात्रात पाय टाकायला संकोच वाटतो, अनादर होईल असं वाटतं, औद्धत्याचं वाटतं. म्हणून जसे नावेत बसून पात्रात मध्यावर कुठेतरी ओंजळभर पाणी घेतो, तद्वत मधलेच चार चौक मायमराठीच्या नावेत बसून ओंजळीत घेतले आहेत...

चार चरणांच्या तीन चौकांचा भावानुवाद इथे द्यायचा धीर करतो आहे. तीच पं. हरिराम द्विवेदी ह्या कविश्रेष्ठाला विनम्र श्रद्धांजली.

***कीर्तिध्वजा भगिरथ राजाची हाच तुझा गे परिचय गंगे***
***उन्मनी साधक मुनिसमुहाचे पुरविशि तूचि मनोदय गंगे।***
***अवनीवरि भवनिधि तरण्याचे साधन तूचि निरामय गंगे***
***भक्तांच्या जळत्या हृदयांस्तव सुखशीतल जलसंचय गंगे।।***

(पृष्ठ क्र.१७ वर)

# फ्रेंच राज्यक्रांतीत एक प्रमुख व्यक्ती कोन्डोसेचे स्त्रीविषयक विचार

*ज्येष्ठ लेखक जयंत कुलकर्णी यांनी नुकते 'फ्रेंच राज्यक्रांती' हे पुस्तक लिहिले आहे. फ्रेंच राज्यक्रांती मधील महत्त्वाची व्यक्ती कोन्डोसेने लिहिलेल्या एका लेखाचा अनुवाद प्रस्तुत लेखात दिला आहे. त्यावरून त्याचे क्रांतीकारक विचार आपल्याला समजतात. संपादक*

फ्रेंच राज्यक्रांतीमध्ये अनेक थोर विचारवंत होऊन गेले, जे मरेपर्यंत आपल्या तत्त्वांना चिकटून राहिले. या राज्यक्रांतीने अनेक नवनवीन विचारांना जन्माला घातले. मुख्य म्हणजे राज्यघटना हा प्रकार जन्माला घातला. हे सगळे असले तरीही ही राज्यक्रांती फ्रान्ससाठी फसलीच म्हणायची... का? ती चर्चा पुस्तकातील मनोगतात करण्याचा विचार आहे.

फ्रेंच राज्यक्रांतीत जी काही प्रमुख मंडळी होती त्यात एक होता ''कोन्डोसे – Marquis de Condorcet. (१७ September १७४३ – २९ March १७९४) त्याने नुसता राजकारणात भाग घेतला नाही; तर तो एक अत्यंत बुद्धिमान गणिती होता. फ्रेंच राज्यक्रांतीची ही एक खासियत आहे. – त्यात सुतार होते, वकील होते, शास्त्रज्ञ होते, गुंड होते, मवाली होते, धर्मगुरू होते, श्रीमंत होते आणि भिकारीही होते...वेश्या होत्या, शेतकरी होता... वृत्तपत्रकार होते, कलाकार होते... कोण नव्हते? या सगळ्या वर्गांतून नेते मंडळी जन्माला आली आणि त्यांनी क्रांतीला दिशा दिली... चुकीची का योग्य हे नंतर कळले..




त्या काळात जेव्हा स्त्रियांना कसलेही हक्क नव्हते, त्यांना मतदानाचा हक्क नाकारण्यात आला होता, त्यामुळे राजकारणाचे दरवाजे त्यांच्यासाठी बंद होते. अशा वातावरणात फ्रान्समधील स्त्रियांनी या क्रांतीत भाग घेतला आणि पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून शस्त्रे उचलली आणि वैचारिक क्रांतीतही भाग घेतला. असो.

कोन्डोसेने लिहिलेल्या एका लेखाचा अनुवाद खाली दिला आहे. त्यावरून त्याचे क्रांतीकारक विचार आपल्याला समजतात. त्याचे चित्रही खाली दिले आहे. हा लेख लिहिला आहे १७८९ मध्ये. जगातील स्त्रियांनी त्यालाही थोडेफार श्रेय देण्यास हरकत नाही.



परंपरांचा मानवाच्या मनावर इतका विलक्षण पगडा असतो, की त्यांना त्यांच्या अधिकारावर अतिक्रमण झाले आहे हे लक्षात येत नाही. ज्यांचे हक्क हिसकावले गेले आहेत, त्यांना ते परत प्रस्थापित करायचे असतात याचाही विसर पडतो. बहुतेक वेळा एवढा काळ लोटून जातो की,

त्यांच्यावर अन्याय झाला आहे याचाही त्यांना विसर पडतो.

निसर्गाने जे हक्क बहाल केले आहेत त्याचे झालेले सर्रास उल्लंघन तत्त्वज्ञानी आणि कायदे तयार करणाऱ्या मंडळींच्या नजरेतून निसटले आहे. ही मंडळी जनतेचे सर्वसामान्य व्यक्तिगत हक्क प्रस्थापित करण्याचे झटून प्रयत्न करत असताना असे व्हावे हे एक आश्चर्यच आहे. असे असताना राजकीय घटनेची स्थापना करताना याकडे दुर्लक्ष होत आहे हे दुर्दैवच म्हणायला हवे. उदाहरणच द्यायचे झाले तर त्यांनी ५०% नागरिकांना नागरिकत्व नाकारून त्यांच्यावर अन्याय केला आहे. लोकसंख्येच्या ५०% संख्या स्त्रियांची आहे. ज्या समानतेचा उद्घोष ही राजकारणी मंडळी करतात ती यावेळी पायदळी तुडवली जात नाही काय? या स्त्रियांना कायदे करण्याच्या प्रक्रियेपासून वंचित ठेवणे हे कुठल्या सभ्यतेत मोडते? परंपरांच्या दडपणाचे एवढे अचूक उदाहरण शोधूनही सापडणार नाही. ३००/४०० पुरुषांचे जर हक्क डावलले गेले तर समानतेच्या तत्त्वाचा भंग झाला म्हणून आरडाओरडा होतो, पण आज या ३००/४०० पुरुषांनी १२ लाख स्त्रियांना निव्वळ या लिंगाबद्दल असलेल्या पूर्वग्रहामुळे समानतेच्या हक्कापासून वंचित ठेवले आहे.

स्त्रियांना या हक्कांपासून वंचित ठेवणे हा एकप्रकारचा त्यांच्यावर होत असलेला अत्याचारच आहे. 'हा अत्याचार नाही' असे म्हणायचे असेल, तर स्त्री आणि पुरुष यांचे मूलभूत हक्क वेगवेगळे आहेत हे सिद्ध करावे लागेल किंवा स्त्रियांकडे हे हक्क बजावण्याची क्षमता नाही हे सिद्ध करावे लागेल.

पुरुष तर्कशुद्ध विचार करतात, ज्ञानप्राप्ती करतात असे म्हटले जाते. या गुणांमुळे पुरुष नीतिमत्ता म्हणजे काय, किंवा सारासार विचार म्हणजे काय हे चांगले समजू शकतात. असे म्हटले जाते की, या कारणामुळे पुरुषांना ते हक्क मिळाले आहेत. आता जर स्त्रियांकडेही हे गुण असतील, तर त्यांनाही हे हक्क मिळण्यास काय अडचण आहे? त्यांनाही समान हक्क मिळायला हवेत. जर मानवी हक्कांवर आपला विश्वास असेल, तर हे हक्क सर्व मनुष्यजातीला मिळायला हवेत, प्रत्येक माणसाला मिळायला हवेत. मग त्याचा रंग कुठलाही असूदेत, त्याचा वंश कुठलाही असूदेत, त्याचा धर्म कुठलाही असूदेत किंवा त्या व्यक्तीचे लिंग कुठलेही असुदेत.. मूलभूत हक्क प्रत्येकाला असावेत; नाहीतर कोणालाच नकोत. जर एखाद्याने दुसऱ्याचे हक्क नाकारले तर त्याने स्वतःच्या हक्कांवर पाणी सोडले आहे असेच म्हणावे लागेल!

स्त्रियांकडे नागरिकत्त्वाचे हक्क वापरण्याची क्षमता नाही हे सिद्ध करणे अवघड आहे, नव्हे अशक्य आहे, नव्हे चुकीचेच आहे. स्त्रियांवर मातृत्वाची जबाबदारी पडते आणि त्यांना दर महिन्याला काही किरकोळ आजार होतात हे मान्य केले, तरी त्यांना हे हक्क का वापरता येणार नाहीत याचे उत्तर कोणी देत नाही. तसे असेल, तर ज्या पुरुषांना अस्थमा, गाऊट सारखे आजार असतात आणि ज्यांना महिन्यातून तीन-चार वेळा तरी या आजाराचे झटके येतात, त्या पुरुषांचे हे हक्क का काढून घेऊ नयेत हाही एक प्रश्न आहे. पुरुषाची विचारक्षमता स्त्रियांपेक्षा जास्त असते हे क्षणभर जरी मान्य केले तरी ती शिक्षणामुळे झाली आहे. तुम्ही स्त्रियांना शिकू देत नाही, म्हणून त्या मागे पडतात. पण स्त्रीपुरुषांची बौद्धिक पातळी समानच असते. असे म्हणतात की, आजवर एकाही स्त्रीने विज्ञानक्षेत्रात एकही महत्त्वाचा शोध लावलेला नाही, किंवा कलाक्षेत्रात, साहित्यात काही चमकदार कामगिरीही केलेली नाही. क्षणभर हेही मान्य केले तरी दुसऱ्या बाजूला पुरुषांच्या बाबतीत फक्त बुद्धिमान, विद्वान पुरुषांनाच हक्क द्यावेत

असा कायदा तुम्ही केलेला नाही. एखाद्या बिनडोक, अर्धवट पुरुषालाही हे हक्क मिळू शकतात. तुम्ही पुढे असेही म्हणता की, कुठल्याही स्त्रीला विद्वान पुरुषांइतके ज्ञान नसते, स्त्रियांचा तर्कशास्त्राशी दुरान्वयेही संबंध येत नाही, पण याचाच दुसरा अर्थ काय होतो? मूठभर विद्वान मंडळींचा अपवाद सोडला, तर उरलेल्या स्त्री-पुरुषांमध्ये कसलाही भेदभाव करता येत नाही. या प्रकारचे विद्वान दोन्ही बाजूला सापडतात आणि यांचा अपवाद सोडल्यास दोन्ही बाजूला बुद्धिमत्ता आणि सर्वसाधारण जनता आढळते आणि या विद्वान स्त्रियांना मतदानाचा हक्क नाकारणे आणि बहुसंख्य पुरुष बहुसंख्य स्त्रियांपेक्षा अडाणी असताना या स्त्रियांना सत्तेपासून वंचित ठेवणे हास्यास्पद आहे, बिनडोकपणाचे आहे. ते म्हणतात, स्त्रियांच्या हृदयात आणि बुद्धीत असे काही गुण/दुर्गुण आहेत ज्यामुळे त्यांना मतदानाचा हक्क नाकारला गेला पाहिजे. हेही एकदा तपासून घेऊ. इंग्लंडची एलिझाबेथ, मारिया थेरेसा, रशियाच्या दोन कॅथरीन या सगळ्या स्त्रियांनी हे सिद्ध केले आहे की, शौर्य, धैर्य आणि मानसिक ताकदीत त्या कुठेही कमी पडलेल्या नाहीत.

श्रीमती मेकॉली हिने हाऊस ऑफ कॉमन्समध्ये कितीतरी प्रतिनिधींपेक्षा जास्त चांगली भाषणे दिली असती हे नव्याने सांगण्याची गरज नाही. स्वातंत्र्याविषयी तिच्याएवढी प्रगल्भ, तर्कशुद्ध मते कोणी मांडली असती की नाही याची शंकाच आहे! मला तर वाटते, तिने इंग्लंडच्या पिटपेक्षा जास्त तर्कशुद्ध विचार मांडले असते. फ्रान्सच्या संविधानावर बर्कने जी हास्यास्पद टीका केली होती तसली तर्कहीन टीकाही तिने केली नसती. हाऊस ऑफ कॉमन्समध्ये जनतेची बाजू मांडण्यासाठी तिच्याएवढा लायक प्रतिनिधी शोधूनही सापडला नसता. फ्रान्समध्ये १६१४ साली कोर्टीन कौन्सिलर म्हणून निवडून गेला. या माणसाचा जादूटोण्यावर विश्वास होता. त्याच्यापेक्षा मॉटेनच्या दत्तक कन्येने नागरिकांच्या हक्कांचे संसदेत चांगल्याप्रकारे रक्षण केले असते असे तुम्हाला वाटत नाही का? राजकुमारी द उर्सिन शॅमिलर्डपेक्षा श्रेष्ठ नव्हती का? थोर गणितज्ञ श्रीमती शॅटलेटनेही पदार्थविज्ञानात चांगले लिखाण केले नाही असे तुम्हाला म्हणायचे आहे का? मादाम लांबार्टने प्रोटेस्टंट पंथ, गुलाम यांच्याविरुद्ध अत्याचारी कायदे केले असते असे तुम्हाला वाटते का? जगावर अधिसत्ता गाजवणाऱ्या पुरुषांच्या कारकीर्दीवर नुसती नजर टाकली तर पुरुषांना अभिमान वाटण्यासारखे त्यात काही नाही हे तुम्हाला पटेल.

स्त्रिया निसर्गतः मृदू स्वभावाच्या असतात आणि त्यांना घरादाराची आणि मुलाबाळांची काळजी असते, पण पुरुषांप्रमाणेच स्वातंत्र्यावर प्रेम कसे करावे हे त्यांना चांगले माहीत असते. दुर्दैवाने स्वातंत्र्याचे सर्व फायदे स्त्रियांना उपभोगता येत नाहीत हे सत्य नाकारता येत नाही. प्रजासत्ताकाच्या स्थापनेत स्त्रियांनी पुरुषांच्या बरोबरीने त्याग केलेला आहे. अगदी प्राणाचीही आहुती त्यांनी दिलेली आहे. असे म्हटले जाते की, स्त्रिया हुशार असतात, व्यवहारी असतात, वादविवादात निपुण असतात, पण त्यांच्याकडे तर्काचा अभाव असतो. अर्थात, हे निरिक्षण चुकीचे आहे यात शंका नाही. स्त्रियांकडे तर्क नसतो, पण पुरुष जो तर्क वापरतात तो! त्यांचे स्वतःचे असे खास तर्कशास्त्र असते.

अस्तित्वात असलेले कायदे स्त्रियांना पुरुषांपेक्षा वेगळी वागणूक देत असल्यामुळे आणि त्यांना दुय्यम समजत असल्यामुळे स्त्रियांना कदाचित पुरुषांपेक्षा वेगळ्या गोष्टीत रस असण्याची शक्यता नाकारता येत नाही. कदाचित त्यामुळेच त्या स्वतःच्या सौंदर्याकडे जास्त लक्ष पुरवत असाव्यात. उदा. डेमॉस्थिनीजने भाषणासाठी स्वतःच्या आवाजावर जास्त कष्ट घेतले होते. हे तर्कहीन नसून फक्त इतरांपेक्षा वेगळे आहे, एवढाच त्याचा अर्थ.

---

माणसाने माणुसकी सोडली की त्याचे रूपांतर पशूत होते.

असेही म्हटले जाते की, स्त्रिया कित्येक बाबतीत पुरुषांपेक्षा जास्त श्रेष्ठ असतात- त्या प्रेमळ असतात, जास्त भावनाशील असतात, त्या दुराभिमानी नसतात, त्यांचे हृदय कठोर नसते. असे असले तरी त्या न्यायाच्या बाबतीत पुरुषांइतक्या कठोर नसतात. त्या बुद्धिने निर्णय न घेता त्यांच्या भावनांवर विसंबून निर्णय घेतात. हे निरीक्षण खरे आहे, पण त्याने काहीच सिद्ध होत नाही. हा काही त्यांचा मूळ स्वभाव नाही, तर हा फरक त्यांच्या शिक्षणामुळे आणि सामाजिक व्यवस्थेमुळे आहे.

ज्याप्रमाणात पुरुषांचे शिक्षण झाले त्याप्रमाणात स्त्रियांचे शिक्षण झाले नाही. ना समाजाने, ना शिक्षणाने स्त्रियांना ''न्याय्य'' म्हणजे काय याची कल्पना दिली. त्यांनी स्त्रियांना फक्त नैतिकता आणि शील जपणे एवढेच काय ते शिकवले. सरकार आणि इतर सरकारी कामकाजांपासून त्यांना दूर ठेवण्यात आले. कायदेकानून, न्याय या गोष्टींची त्यांची ओळख करून दिली गेली नाही. त्यांना न्यायाची किंमत काय असते हे त्यामुळे कधी कळले नाही. आता ज्या गोष्टींचा स्त्रियांना अनुभव घेऊ दिला गेला नाही, त्याबद्दल त्या गोष्टी त्यांच्याकडे नाहीत ही तक्रार करण्यात काय अर्थ आहे? या सगळ्या कारणांनी ज्या गोष्टींचा नैसर्गिक भावनांशी संबंध येतो. फक्त त्या बाबतीतच पुरुषांनी स्त्रियांना हस्तक्षेप करून दिला आहे.

जर स्त्रियांना नागरिकत्व नाकारण्यासाठी ही कारणे दिली जात असतील; तर जे पुरुष जगण्यासाठी दिवस-रात्र काबाडकष्ट करतात व ज्यामुळे त्यांच्याकडे शिक्षणासाठी वेळ उरत नाही, ज्यांना तर्कशास्त्र वापरण्यासाठी वेळच मिळत नाही, ज्यांना कायद्याचा अभ्यास करण्यासाठी वेळ मिळत नाही (कारण उपाशी माणसांना ही चैन परवडणारी नसते) अशा पुरुष नागरिकांनाही नागरिकत्व नाकारले जावे. जर स्त्रियांवर अन्याय करणारी ही तत्त्वे मान्य केली, तर मग उदारमतवादी संविधानाचाही आपण त्याग केला पाहिजे. हळूहळू मग काय होईल? फक्त वकिलांनाच नागरिकत्व द्यावे लागेल. कदाचित असल्या संविधानाचाही आपल्याला त्याग करावा लागेल.

आजवर सत्तेत असलेल्या राजेशाहींनी ज्या तत्त्वावर विसंबून सत्ता उपभोगली, त्या 'राजेशाही' या शब्दातच त्या तत्त्वांचे मूळ आपल्याला सापडेल. स्त्रिया त्यांच्या पुरुषांना शरण जातात, किंवा पुरुष स्त्रियांवर अधिकार गाजवतात हेच राजेशाही प्रस्थापित होण्याचे एक कारण आहे. एकाने दुसऱ्यावर अन्याय केला असेल तर पुढे होणाऱ्या अन्यायाचे ते समर्थन होऊ शकत नाही.

या सगळ्याचा गांभीर्याने विचार केला, तर स्त्रियांच्या स्वातंत्र्याचा हक्क आणि मतदानाचा हक्क नाकारण्यासाठी घेतलेल्या फक्त दोन आक्षेपांवर चर्चा होऊ शकते. हे आक्षेप चलाखी, पुरुषांची सोय आणि फायदे या बाबींवर बेतलेले आहेत हे आपल्या सहज लक्षात येईल. स्वार्थासाठी व्यापार आणि उद्योग वेठीस धरण्यात आले, आफ्रिकेला गुलामीत ढकलण्यात आले आणि बस्टीलला गर्दी जमवण्यात आली. हे नैतिकतेला धरून नाही एवढेच मी म्हणेन. अन्यायाकडे आपली सोय होते म्हणून दुर्लक्ष करण्यामुळे भूतकाळात अत्यंत हीन गोष्टी घडल्या आहेत. उदा. गुलामी आणि सेन्सॉरशिप. हुकूमशहा बहुतेकवेळा त्यांनी केलेल्या अत्याचारांसाठी हीच कारणे देतात. (जी कारणे ते स्त्रियांना हक्क नाकारताना देतात ती!) या कारणांवर चर्चा होऊ शकते आणि ही कारणे अत्यंत फालतू आहेत हे मी सिद्ध करू शकतो, म्हणजे घेतल्या गेलेल्या सर्व आक्षेपांना उत्तरे मिळतील.

सध्या आपल्याला स्त्रिया पुरुषांवर हुकमत गाजवतील असे इशारे मिळत आहेत. जोपर्यंत हा प्रभाव समाजावर उघडपणे पडत नाही, तोपर्यंत त्याची दखल घेण्याची गरज नाही आणि जर स्त्रीचा प्रभाव

जनसमुदायावर पडत असेल, तर त्याची तीव्रता साहजिकच कमी असेल. आजपर्यंत कुठल्याही देशांत स्त्रियांना समान हक्क मिळालेले नसले, तरी त्यांचा प्रभाव सर्व क्षेत्रांत पडलेला दिसतो. कायद्याने स्त्रियांना खालचा दर्जा मिळाल्यामुळे त्यांचा प्रभाव जास्त धोकादायक झाला आहे असे म्हणता येईल. स्त्रियांचा प्रभाव वाढतो आहे म्हणून त्यांच्यावर दडपशाही करणे हे फारसे शहाणपणाचे नाही असे माझे स्पष्ट मत आहे. जर स्त्रियांना त्यांचे हक्क राखण्याचा हट्ट सोडावा लागला, तर साहजिकच त्यांची चळवळ कमी होईल आणि त्यांचा प्रभाव कमी होईल. म्हणून त्यांना त्यांचे हक्क देऊन टाकण्यातच शहाणपणा आहे.

माणसाचे नैसर्गिक हक्क डावलले गेले आहेत आणि त्याकडे तत्त्वज्ञानी आणि राजकारण्यांनी दुर्लक्ष केले आहे. समाजातील घटकांच्या सामाजिक हक्कांसाठी याच मंडळींनी बरीच धडपड केली आहे, पण दुर्दैवाने त्यांनी समाजातील एका मोठ्या घटकाला समानतेच्या हक्कापासून वंचित ठेवले आहे. यावरून हेच सिद्ध होते आहे की, समाजातील बुद्धिमान वर्गालाही समाजातील लाखो स्त्रियांचा विसर पडला आहे. ३००/४०० पुरुषांचे हक्क जेव्हा हिसकावले जातात तेव्हा ही मंडळी त्यांच्या हक्कांच्या रक्षणासाठी उभे ठाकतात, पण लाखो स्त्रियांकडे दुर्लक्ष करतात. हा सत्तेचा माज नाहीतर काय म्हणायचे? ही ज्ञानी मंडळी तत्त्व लागू करताना भेदभाव करतात हे यावरून स्पष्ट होत आहे.

स्त्रियांना त्यांच्या हक्कांपासून वंचित ठेवण्याचे हे कृत्य जर अत्याचारी नाही असे सिद्ध करायचे असेल तर, आपल्याला स्त्रियांचे आणि पुरुषांचे हक्क समान आहेत हे सिद्ध करावे लागेल किंवा स्त्रियांकडे हे हक्क वापरण्याची क्षमता नाही हे सिद्ध करावे लागेल ! पण असे म्हणतात, की पुरुषांना जे हक्क प्रदान केले गेले आहेत ते त्यांच्यात असलेल्या काही उपजत गुणांमुळे. उदा. ते बुद्धिवादी असतात, ज्ञानपिपासू असतात, नीतिमत्तेच्या बाबतीत ते अधिक संवेदनशील असतात आणि नीतिमत्तेच्या कल्पनांचा विचार ते अधिक तर्कशुद्धपणे करतात. मग ज्या स्त्रियांकडे हे गुण आहेत त्यांनातरी समान हक्क मिळाले पाहिजेत. मनुष्याला कसलेही हक्क नसावेत किंवा सर्व मनुष्यजातीला समान हक्क असावेत असे आमचे म्हणणे आहे आणि जर एखाद्याने दुसऱ्याच्या हक्कांविरोधी मतदान केले असेल तर त्याने स्वतःच्या हक्कांचा त्यागच केला आहे असे म्हणावे लागेल.

स्त्रियांकडे नागरिकत्त्वाचे हक्क राबवण्याची क्षमता नसते हे सिद्ध करणे अशक्य आहे. आज आपल्या लोकसभेत कित्येक प्रतिनिधी त्यांच्या बायकांमुळे बसले आहेत. मी विचारतो 'मग त्या स्त्रियांनाच मतदानाचा हक्क देऊन, लोकसभेत का बसवू नये?'.... इ.इ.इ..

**– जयंत कुलकर्णी**
ज्येष्ठ अभ्यासक, पुणे

●●●

---

(पृष्ठ क्र. १२ वरून – **जय गंगे भागिरथी... 'गंगाशतक'कारांना विनम्र श्रद्धांजली** )

*दिशादिशांतून गुंजत गर्जत गंगधार गतिमान वाहते*
*पात्रातील पाषाणखंड ढकलीत करित थैमान वाहते ।*
*पर्वतरांगातून रोरावत उचंबळत बेभान वाहते*
*भग्न करित नग वाळूकणांतून गात गात मृदुगान वाहते।।*

*निर्झर नदि नाले वाटेतिल सहजपणे जिरवीत वाहते*
*भागीरथी अविरत पात्रातून प्रेमगीत मिरवीत वाहते ।*
*गाव तसाच लगाव स्विकारित रीत तशी गिरवीत वाहते*
*जीवनमुक्तिमहाधन देण्या उदक न अमृतगीत वाहते ।।*

**– प्रमोद वसंत बापट**

●●●

# संगीतायन
## नांदी

*मराठी संगीत रंगभूमी ही रसिकांच्या मर्म बंधातली ठेव आहे. 'संगीतायन' या लेखमालेतून आपण संगीत या विषयाशी जोडल्या गेलेल्या अनेक घटना, संगीत प्रकार, कलाकारांचे किस्से अशा अनेक गोष्टींचा आस्वाद घेणारा संवाद साधणार आहोत. सुरुवात करूया 'नांदी' या अभिजात संगीत कलाकृतीच्या परिचयातून अण्णासाहेब किर्लोस्कर, कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर, गोविंद बल्लाळ देवल, श्रीपाद कोल्हटकर, वि.दा. सावरकर, विद्याधर गोखले, वसंत कानेटकर, पुरुषोत्तम दारव्हेकर अशा अनेक दिग्गज नाटककारांनी मराठी संगीतभूमीला चिरतरुण ठेवलं. १८४३ सालच्या 'सीता स्वयंवर' या पहिल्या संगीत नाटकापासून सौभद्र, स्वयंवर, शाकुंतल, मानापमान, संन्यस्त खड्ग, मूकनायक, जय जय गौरीशंकर, कट्यार काळजात घुसली, बावनखणी अशा अनेक संगीत नाटकांमध्ये विविध राग व ताल यामध्ये नांदी साकार झाली. त्याचा थोडाफार रंजक इतिहास या संवादातून समजून घेऊ. - संपादक*

काही मराठी शब्द इतके अर्थपूर्ण आणि सूचक असतात की, ते नुसते उच्चारले तरी आपल्यापुढे दृश्यमय होतात. असाच एक शब्द म्हणजे 'नांदी'. अस्सल मराठी संगीत रंगभूमी प्रेमी, या शब्दानेच सुखावतो. हा शब्द एक सुंदर दृश्य आपल्यापुढे उभं करतो. नाटक सुरू होण्याची तिसरी घंटा घणघणली आहे, रंगमंचावर मखमली पडद्याची आणि नटेश्वराची पूजा करून हार घातला आहे. उदा. -धुपाचा मंद सुगंध आसमंतात दरवळतोय. ऑर्गनचे दमदार सूर ऐकू येतात, तबल्याची मस्त थाप कानावर पडते आणि पडद्यामागून सप्तसुर नादमय करणारी नांदी सुरू होते !




नांदीच्या स्वरमय वातावरणाला दिलेली उदा-धुपाची सुवासिक जोड या मागची पण एक गमतीदार घटना आहे. 'संगीत शाकुंतल' मधील नांदी मोरोबा वाघोलीकर म्हणणार होते. मोरोबा उत्तम गायक होते. पण त्यांना संगीत नाटकात संवाद म्हणत असताना गाणं सुरू करायचं, परत संवाद म्हणत अभिनय करायचा या प्रकारचं प्रचंड दडपण येत होतं. मोरोबा जंगली महाराजांचे शिष्य होते. नाटकाचा प्रयोग ठरला आणि मोरोबांनी गुरूजवळ जाऊन ही समस्या सांगितली. महाराजांनी आपल्या या गुणी पण भांबावलेल्या शिष्याची मानसिक स्थिती ओळखली. आपल्या झोळीतून एक मूठभर धूप काढून त्यांनी मोरोबांच्या हातात दिला आणि सांगितलं की, 'उद्या नाटकाला उभा राहशील त्याच्या आधी पडद्यामागे धूप घाल, पूजा कर आणि नंतर तुझी नांदी म्हणायला सुरुवात कर.' खरंतर गुरूने सांगितलेलं हे एक छोटं कर्मकांडच होतं. पण त्या कृतीमुळे आणि गुरूवरील विश्वासामुळे त्या दिवशी मोरोबांचा अभिनय आणि गायन उत्तम होऊन प्रयोग असा काही रंगला की तेव्हापासून सर्व कलाकारांचा एक विश्वास तयार झाला की, नांदी सुरू व्हायच्या आधी रंगमंचावर धूप घालायचा आणि पूजा करायची. हा प्रघात आजही मोठ्या श्रद्धेने कलाकार पाळतात.

या पारंपरिक नांदीची व्याख्या म्हणजे नाटकाच्या सुरुवातीला म्हटलेला इष्ट देवतांच्या नमनाचा किंवा प्रार्थनेचा श्लोक. म्हणजे एकाप्रकारे ईशस्तवनच. थोडंसं

इतिहासात डोकावलं तर भरताच्या नाट्यशास्त्रात पाचव्या अध्यायात नांदी हा 'पूर्व रंग' नावाच्या पूजा विधीचा तेरावा उपविभाग मानला जातो. नांदीची व्याख्या करताना भरत म्हणतो, -

''आशिर्वचन संयुक्ता, नित्यम यस्मात् प्रयुज्यते ।
देवद्विज नृपादीनाम् तस्मान् नांदिती संज्ञीता ।।''

म्हणजे नाट्यप्रयोगाची सुरुवात देव-ब्राह्मण आणि राजे यांच्या आशीर्वादाने युक्त होते तिलाच 'नांदी' म्हणतात. तर नांदी म्हणजे 'नंदते यत्र देवता: स इति नांदी उच्वते' असा पण एक संदर्भ नांदीबद्दल आढळतो. कालिदास, शूद्रक, भवभूती, भट्ट नारायण, श्रीहर्ष अशा अनेक संस्कृत नाटककारांनी आपल्या नांदी रचनांमध्ये शिवस्तुती किंवा कृष्णस्तवन हे सूत्र ठेवलेलं आढळतं आणि नांदी ही प्रत्येक नाट्यप्रयोगापूर्वी नित्य म्हणजे कायम म्हणण्याचा प्रघात पडला.

मराठी रंगभूमीवर ही नांदी दृश्य स्वरूपात आली ती १८४३ मध्ये, आद्य नाटककार विष्णुदास भावे यांच्या 'सीता स्वयंवर' नाटकाच्या पहिल्या प्रयोगात ! नाट्यपंढरी सांगली इथे, भारदस्त यमन रागाच्या स्वरात 'श्री गजवदना दे मतिहीना' हे मंगलाचरण गाईलं गेलं आणि संगीत रंगभूमीवर नांदी पुन्हा नांदू लागली !!!

१८४३ च्या काही काळ आधी पण कानडी आणि पारशी रंगभूमीवर विविध संगीत नाट्यप्रयोग होत असत आणि यापैकी बरीच नाटकं पौराणिक असत. या सर्व पौराणिक नाटकांमध्ये एका विशिष्ट पद्धतीने नांदी म्हणायची संकल्पना असे. यामध्ये पडदा उघडायच्या आधी सूत्रधार पडद्याबाहेर येऊन नांदी म्हणायचा. मग विदूषकाची स्वारी यायची, गणराजाचं आगमन व्हायचं. नाटक निर्विघ्नपणे पार पडू दे यासाठी गणरायाची प्रार्थना व्हायची. मग गणराजाचा आशीर्वाद पटकावून सूत्रधार शारदा मातेचं स्तवन करायचा (रंगभूमीवर स्त्री-पुरुष समानता कायदा केव्हापासून सुखानं नांदी बरोबर नांदतो आहे) आणि त्यानंतर नाटकाचा कथाभाग सुरू व्हायचा.

मराठी संगीत नाटकांचा खऱ्या अर्थाने शुभारंभ झाला तो १८८० साली 'संगीत शाकुंतल' या नाटकाने! 'संगीत शाकुंतल' मध्ये अण्णासाहेब किर्लोस्करांनी कण्वमुनी आणि शकुंतला हे वडील आणि मुलीचं संयत नातं आणि दुष्यंत शकुंतला यांचं दैवदत्त प्रेम हळुवारपणानं मांडलं. नवीन पिढीला संगीत रंगभूमीचं आकर्षण वाटत राहावं त्यासाठी महत्त्वाचे बदल अण्णासाहेबांनी या नाटकात केले. कालिदासाच्या 'शाकुंतम्' या सात अंकी नाटकाचं चार अंकात रूपांतर केलं आणि १८४३ काळातील नांदी मधील गजानन, विदूषक, सरस्वती या पात्रांना रजा दिली. नाटकाच्या सुरुवातीला सर्व गायक कलाकारांनी एकत्र येऊन पडद्यामागून गायन करायचं ठरलं. ३१ ऑक्टोबर १८८० रोजी पुण्यात 'संगीत शाकुंतल' चा पहिला प्रयोग ठरला. अण्णासाहेब किर्लोस्कर, नाटेकर, मोरोबा वाघोलीकर आणि शेवडे ही मंडळी पडद्याआड 'पंचतुंड नर रुंडमालधर' म्हणायला उभी राहिली. पण पडदेवाला होता खास पुणेरी ! त्याला नाटकाला होणारा हा विलंब सहन झाला नाही आणि म्हणून त्यानं झटदिशी पडदा उघडला. प्रेक्षकांना समोर दिसली चक्क अण्णासाहेब किर्लोस्करांची धिप्पाड भव्य मूर्ती आणि कानावर पडले सर्व कसलेल्या गायक कलाकार मंडळींचे गंधर्व गान ! प्रेक्षक मंडळी बेहद्द खूश झाली आणि आजही अत्यंत लोकप्रिय असलेली 'पंचतुंड नर रुंडमालधर' नांदी अशाप्रकारे पहिल्यांदा संगीत रंगभूमीवर साकार झाली. (क्रमशः)

**- डॉ. कीर्ती आगाशे**
विभाग प्रमुख - इंडस्ट्रियल इलेक्ट्रॉनिक्स
विद्या प्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतन, ठाणे

●●●

# परिसर वार्ता

– संकलित

## सौ. आनंदीबाई जोशी इंग्रजी पूर्व प्राथमिक विभाग

**नोव्हेंबर ते डिसेंबर पर्यंतचे उपक्रम :–**

दिवाळीची सुट्टी संपून २८ नोव्हेंबर रोजी दुसऱ्या सत्राची सुरुवात झाली. एक – दोन दिवसांतच डिसेंबर महिन्यात होणाऱ्या वार्षिक स्नेहसंमेलनाचे वारे वाहू लागले. गाण्याची निवड, त्या अनुशंगाने लागणारी वेशभूषा यावर चर्चा सुरू झाली. शिक्षकांनी मुलांना गाण्यावर नृत्य करण्यास शिकवायला, सरावाला प्रारंभ झाला.

**गुलाबी रंग दिवस – (८ डिसेंबर)**

पूर्व प्राथमिक विभागात ह्या दिवशी सर्व मुलांनी गुलाबी रंगाचे कपडे परिधान केले होते.

**संस्कृती कला दर्पण – (२१ डिसेंबर)**

आंतरशालेय नृत्य व नाट्य स्पर्धा. आमची शाळा गेली ९ वर्षे या स्पर्धेत सहभागी होत असून अनेक बक्षिसांची मानकरी ठरत आहे. यावर्षी शेतकरी नृत्य व 'The Diligent and the Lazy Girl' या नाटुकल्यासहित आम्ही या स्पर्धेत भाग घेतला व पुढील बक्षिसे पटकावली.

सर्वोत्कृष्ट नृत्य – २ रा क्रमांक
सर्वोत्कृष्ट नाटक – २ रा क्रमांक
सर्वोत्कृष्ट लेखिका – सौ. योगिता नाईक
सर्वोत्कृष्ट शाळा – फिरती ढाल व सन्मान चिन्ह

**वार्षिक स्नेहसंमेलन –**

२१ डिसेंबर – माध्यमिक विभाग स्नेहसंमेलन
२२ डिसेंबर – प्राथमिक विभाग स्नेहसंमेलन
२३ डिसेंबर – पूर्व प्राथमिक विभाग स्नेहसंमेलन

मुलांनी सदर केलेल्या विठ्ठलाच्या श्लोकांनी व गाण्याने कार्यक्रमाची सुरुवात झाली. विविध भाषांतील (मराठी, इंग्रजी, पोर्तुगीज) नृत्याविष्कारांनी कार्यक्रमाची रंगत वाढवली. सर्वात शेवटी सिनीयर के.जी. च्या विद्यार्थ्यांनी ''The Diligent and the Lazy Girl',', हे नाटुकले सादर केले. जमलेल्या पालकांनी, तसेच शिक्षक वर्गाने आमच्या बाल कलाकारांचे भरभरुन कौतुक केले.

**नाताळ – (२७ डिसेंबर)**

२५ डिसेंबरला जगभरात साजरा होणारा नाताळ आम्ही २७ ता. ला साजरा केला. आमची लहान मुले लाल – पांढऱ्या रंगाचे कपडे परिधान करून आली. आमचे चिमुरडे फारच आनंदात होते. नाताळची गाणी त्यावर नृत्य करत, सांताक्लॉजची वाट बघणारी आमची चिमुकली नाताळची मजा लुटत होते.

नर्सरी व ज्युनियरसाठी आमच्या लोटस ग्रुपची सयुरी ब्रिजलानी तर सिनीयरसाठी आमच्या स्टार ग्रुपचा स्वामी पाटील सांताक्लॉज झाले होते. रवा केक व वेफर्सचा खाऊ मुलांना दिला गेला.

- नर्सरी – १० ते ११
- ज्यूनियर – १०:३० ते ११:३० (उपक्रम – ख्रिसमस ट्री चे चित्र रंगवणे).
- सिनियर – १:३० ते २:३० (उपक्रम – सांताक्लॉजचे चित्र रंगवणे).

**क्रीडादिन – ठाणे महाविद्यालयाचे पटांगण**

- **२८ डिसेंबर – सकाळी १०:३० ते १२:३० (नर्सरी व ज्यूनियर के.जी.)**

नर्सरी – धावणे, चेंडू बादलीत ठेवून पळणे.

ज्यूनियर - धावणे, बाऊलमधील वाळूतून प्लास्टिकचे फुल शोधून धावणे.

असे खेळ खेळण्यात आले व सर्वच मुलांना बॅट व बॉल असे बक्षीस देण्यात आले.

- २९ डिसेंबर - सकाळी १०:३० ते १२:३० (सिनीयर के.जी.)

धावणे, कपाच्या उलट्या भागावर चेंडू ठेवून चालणे - टग ऑफ वॉर, यासारखे खेळ खेळण्यात आले. सापशिडी व ल्यूडोचा खेळ मुलांना बक्षीस म्हणून देण्यात आला.

## जोशी-बेडेकर कला व वाणिज्य महाविद्यालय (स्वायत्त)

**दि. २४ व २५ नोव्हेंबर २०२३- विद्यार्थी केंद्रित उपक्रम**

'एम.कॉम. विभागातर्फे संशोधनात सांख्यिकीय विश्लेषण' या विषयावर मार्गदर्शनपर व्याख्यानाचे आयोजन दि. २४ आणि २५ नोव्हेंबर २०२३ रोजी करण्यात आले होते. प्रा.मोहिनी कुलकर्णी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यात व्याख्यानासाठी ३८ विद्यार्थी उपस्थित होते.

सेल्स आणि मार्केटिंग विभाग B.VOC तर्फे दि. ३१ ऑक्टोबर ते २० नोव्हेंबर २३ या कालावधीत 'फायनान्स लॅब प्रमाणपत्र अभ्यासक्रम' आयोजन करण्यात आले होते. हा प्रमाणपत्र अभ्यासक्रम एकूण ३० तासांचा होता. दिवसाला २ तास या प्रमाणे १५ दिवसाच्या कालावधीत हा कोर्स घेण्यात आला. एज्युफिनपॅक्ट लॅब प्रा. लि. यांच्या सहकार्याने विद्यार्थ्यांना वित्तीय साक्षरता त्याचसोबत शेअर बाजार, कमोडिटी बाजार यांची माहिती देण्यात आली. यात प्रमाणपत्र अभ्यासक्रमात एकूण ४३ विद्यार्थी सहभागी झाले.

**दि. २९ नोव्हेंबर, ३० नोव्हेंबर, १ डिसेंबर, २ डिसेंबर २०२३ रोजी डॉ. वा. ना. बेडेकर स्मृती व्याख्यानमाला संपन्न:**

दि. २९ नोव्हेंबर २०२३ - प्रसिद्ध प्राच्य विद्या अभ्यासक डॉ. श्रीकांत बहुलकर यांनी 'देशोदेशीच्या संस्कृत विद्या' या विषयावर पहिले पुष्प गुंफले.

विद्या प्रसारक मंडळाचे के. ग. जोशी कला व ना. गो. बेडेकर वाणिज्य महाविद्यालय ठाणे, आयोजित डॉ. वा. ना. बेडेकर स्मृती व्याख्यानमाला कार्यक्रम शनिवार दिनांक २९ नोव्हेंबर २०२३ रोजी सकाळी १०.३० वाजता महाविद्यालयाच्या पाणिनी सभागृहात पार पडला. सदर व्याख्यानमालेचे हे ३८ वे पुष्प 'देशोदेशीच्या संस्कृत विद्या' या विषयावर ज्येष्ठ प्राच्यविद्या संशोधक डॉ. श्रीकांत बहुलकर यांच्या मार्फत गुंफले गेले. सदर कार्यक्रमास विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. विजय बेडेकर, महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक, सौ. सुमेधा बेडेकर, उपप्राचार्य डॉ. महेश पाटील हे देखील उपस्थित होते.

'संस्कृत भाषेबद्दल वाटणारी गोडी आणि नवीन शैक्षणिक धोरणाद्वारे भारतीय ज्ञानपरंपरा महाविद्यालयात राबवणे', याविषयी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांनी वक्तव्य केले.

सदर व्याख्यानमालेत 'देशोदेशीच्या संस्कृत विद्या' या विषयावर बोलताना डॉ. श्रीकांत बहुलकर यांनी एका संस्कृत श्लोकापासून सुरुवात केली. त्यानंतर त्यांनी संस्कृत भाषेसारख्याच जुन्या असलेल्या पाली, प्राकृत आणि तमिळ भाषेबद्दल सांगितले. भारतातून तिबेट मधे गेलेले संस्कृत हस्तलिखिते, विविध देशांतील संस्कृत भाषेचे महत्त्व, भारतातील वेदपाठशाळा आणि तेथील संस्कृत भाषेचा अभ्यास, संशोधन अशा विविध विषयांवर त्यांनी भाष्य केले. संस्कृत भाषेबद्दल बोलताना त्यांनी

आपल्या महाविद्यालयात असणाऱ्या पाणिनी, कात्यायन सभागृहांबद्दलही सांगितले.

विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. विजय बेडेकर व महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली, उपप्राचार्य व डॉ. वा. ना. बेडेकर स्मृती व्याख्यानमालेचे प्रमुख डॉ. महेश पाटील व जनसंवाद व पत्रकारिता, तसेच मराठी विभागाचे प्राध्यापक व स्वयंसेवकांनी सदर कार्यक्रमाचे आयोजन केले. प्रा. अंकुर काणे यांनी सदर कार्यक्रमाचे निवेदन केले. महाविद्यालयाचे १४८ विद्यार्थी, १२ शिक्षक व ठाणेकर रसिक मोठ्या संख्येने या व्याख्यानास उपस्थित होते. सदर व्याख्यानमालेला व उपस्थित होते. विद्यार्थी व अन्य श्रोत्यांच्या प्रश्नांची समर्पक उत्तरे डॉ. श्रीकांत बहुलकर यांनी दिली. कार्यक्रमाची सांगता पसायदानाने झाली.

दि. ३० नोव्हेंबर २०२३ – पद्मश्री. डॉ. तात्याराव लहाने यांनी 'माझा शैक्षणिक प्रवास' या विषयावर बोलत या व्याख्यानमालेतील दुसरे पुष्प गुंफले.

''खेड्यातील तरुणांच्या अपेक्षा फार कमी असतात. छोटे ध्येय ठरवून ते प्रवास करीत राहतात. शहरातील तरुण मात्र लगेच मोठा उद्योगपती होण्याचे स्वप्न पाहतात. अपयश आले की निराश होतात. खेड्यातील तरुण लवकर निराश होत नाहीत. ध्येयपूर्तीसाठी प्रयत्न करत राहतात. त्याचवेळी शहरातील तरुण कोलमडून गेलेले पाहायला मिळतात. यासाठी प्रत्येक तरुणांनी झेपेल तेवढीच उडी घ्यावी.'' असे आवाहन नेत्रतज्ज्ञ डॉ. तात्याराव लहाने यांनी केले. डॉ.वा.ना.बेडेकर स्मृती व्याख्यान मालेचे एकोणचाळीसावे पुष्प गुंफताना 'माझा शैक्षणिक प्रवास' या विषयावर ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ.विजय बेडेकर, प्राचार्या डॉ.सुचित्रा नाईक, उपप्राचार्य डॉ.महेश पाटील उपस्थित होते.

''यशस्वी जीवनासाठी खडतर परिश्रम करण्याची तयारी विद्यार्थ्यांनी ठेवली पाहिजे'', असे सांगून पद्मश्री डॉ. तात्याराव लहाने पुढे म्हणाले, ''आजचा काळ प्रचंड स्पर्धेचा आहे. या स्पर्धेत टिकायचे असेल तर छोटी छोटी स्वप्ने पाहून ती पूर्ण करण्यासाठी अथक मेहनत करा. ही मेहनत करताना स्वतःचा तोल ढळू देऊ नका.'' मोबाईलचा अतिवापर टाळण्याचा सल्लाही त्यांनी दिला. यावेळी डॉ.विजय बेडेकर, प्राचार्या डॉ.सुचित्रा नाईक यांचीही भाषणे झाली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.संतोष राणे यांनी केले. या व्याख्यानमालेसाठी महाविद्यालयाचे १३० विद्यार्थी व २३ शिक्षक तसेच अनेक ठाणेकर नागरिक उपस्थित होते.

दिनांक १ डिसेंबर २०२३ – ९७ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे नियोजित अध्यक्ष डॉ. रवींद्र शोभणे यांनी 'आजचा विद्यार्थी आणि सामाजिक परिस्थिती' या विषयावर मार्गदर्शन करत या व्याख्यानमालेतील तिसरे पुष्प गुंफले.

विद्या प्रसारक मंडळाचे के. ग. जोशी कला व ना. गो. बेडेकर वाणिज्य महाविद्यालय ठाणे, आयोजित डॉ. वा. ना. बेडेकर स्मृती व्याख्यानमाला कार्यक्रम शुक्रवारी दिनांक १ डिसेंबर २०२३ रोजी सकाळी १०.३० वाजता महाविद्यालयाच्या पाणिनी सभागृहात आयोजित करण्यात आला होता. सदर व्याख्यानमालेचे हे ४० वे पुष्प 'आजचा विद्यार्थी आणि सामाजिक परिस्थिती' या विषयावर डॉ. रवींद्र शोभणे यांच्या मार्फत गुंफले गेले. सदर कार्यक्रमास विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. विजय बेडेकर, महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक, सौ. सुमेधा बेडेकर, उपप्राचार्य डॉ. महेश पाटील हे देखील उपस्थित होते.

'लेखनाबाबत कार्यशाळा महाविद्यालयात राबवणे', याविषयी महाविद्यालयाच्या प्राचार्या

---

अतिशहाणा त्याचा बैल रिकामा.

डॉ. सुचित्रा नाईक यांनी वक्तव्य केले. महाविद्यालयातील वार्षिक अंक 'युवाशिल्प' अनावरणाची घोषणा आणि या अंकाची माहिती डॉ. सुचित्रा नाईक यानी सांगितली. महाविद्यालयाचा वार्षिक अंक 'युवाशिल्प' या अंकात वार्षिक घडामोडीचा अस्सलपणा आणि कलात्मक मांडणी असते. या व्याख्यानमालेत महाविद्यालयाच्या वार्षिक अंक 'युवाशिल्प'चे अनावरण झाले.

सदर व्याख्यानमालेत 'आजचा विद्यार्थी आणि सामाजिक परिस्थिती' या विषयावर बोलताना डॉ. रवींद्र शोभणे यांनी त्याच्या पहिल्या मुंबई प्रवासाचे अनुभव सांगून सुरुवात केली. त्यानंतर त्यांनी आजचे विद्यार्थ्यांचे प्रश्न हे खूप गुंतागुंतीचे आहेत असे सांगितले. शोभणे यांनी त्यांचा जीवनप्रवास, बालपणापासून ते अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष कशाप्रकारे, कोणत्या परिस्थितीमध्ये झाले? तसेच जिद्द, चिकाटी, मेहनत कशी केली पाहिजे? विद्यार्थ्यांनी सुरुवातीला कोणती पुस्तके वाचणे गरजेचे आहे? अशा विविध विषयांवर त्यांनी भाष्य केले. कोणतीही कला वाईट नसते. पण त्या कलेत मुळापर्यंत जाण्याची प्रवृत्ती ही यश मिळवून देते हे त्यांनी सांगितले.

विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. विजय बेडेकर व महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली, उपप्राचार्य व डॉ. वा. ना. बेडेकर स्मृती व्याख्यानमालेचे प्रमुख डॉ. महेश पाटील व जनसंवाद व पत्रकारिता, तसेच मराठी विभागाचे प्राध्यापक व स्वयंसेवकांनी सदर कार्यक्रमाचे आयोजन केले. संपूर्ण कार्यक्रमाचा धुरा प्रा. रुपेश महाडिक यांनी पार पाडली. महाविद्यालयाचे १४६ विद्यार्थी आणि १८ शिक्षक व ठाणेकर रसिक मोठ्या संख्येने या व्याख्यानास उपस्थित होते. विद्यार्थी व अन्य श्रोत्यांच्या प्रश्नांची समर्पक उत्तरे डॉ. रविंद्र शोभणे यांनी दिली. कार्यक्रमाची सांगता पसायदानाने झाली.

ठाण्यातील विद्याप्रसारक मंडळाच्या के.ग. जोशी कला व ना.गो. बेडेकर वाणिज्य स्वायत्त महाविद्यालयात डॉ. वा. ना. बेडेकर व्याख्यानमालेतील ४१ वे पुष्प गुंफताना पद्मश्री डॉ. गिरीश प्रभुणे यांनी 'प्राचीन भारतीय संस्कृती आणि भटके विमुक्त जनजाती' यासंदर्भात विवेचन केले. यावेळी व्यासपीठावर विद्याप्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ.विजय बेडेकर, प्राचार्या डॉ.सुचित्रा नाईक, उपप्राचार्य डॉ.महेश पाटील उपस्थित होते.

दिनांक २ डिसेंबर २०२३ – पद्मश्री. डॉ. गिरीश प्रभुणे यांनी प्राचीन भारतीय संस्कृती आणि भटके विमुक्त जनजाती या विषयावर व्याख्यान देत हा व्याख्यानमालेचे चौथे पुष्प गुंफले.

पद्मश्री डॉ. गिरीश प्रभुणे म्हणाले, – प्राचीन काळी भारत समृद्ध असल्यानेच १५ व्या शतकात भारताचा शोध घेण्याची इच्छा कोलंबसला झाली. कारण पाश्चात्त्यांना मोहात टाकणारा हा भारत आहे. 'भा' म्हणजे तेज .. ज्ञानात, कलेत 'रत' असणारा देश म्हणजे भारत होय. जगाला सुख, शांती, समृद्धी देणे हाच भारताचा जीवनमंत्र होता. इतकी भारतातील भटक्या विमुक्त समाजाची रचना अभूतपूर्व आहे. त्याकाळी भटक्या– विमुक्त जाती– जमातींमधल्या धनगर,वडार, कैकाडी, लमाणी, ओतारी, वारली, आदिवासी, पारधी आदी प्रत्येक जाती जमातीचा आढावा घेतल्यास एकप्रकारे या सर्व औद्योगिक वसाहती असल्याचे दिसून येते. भारतातील सर्व भाषा व लिपींमध्ये ९५ टक्के साम्य आहे. याचे कारण भटक्या – विमुक्त जाती आहेत. पूर्वीच्या काळी बारा बलुतेदारी पद्धत होती, पैशाचा व्यवहार नसतानाही समानतेचा संदेश भारतीय संस्कृतीत होता. आज श्रीमंती पैशाने मोजली जाते. पुढे भारतीय संस्कृती गरजेप्रमाणे विकसित होत गेली. मात्र, अशा विकसित समाजामध्ये भटके – विमुक्त घटक आजही

उपरा असल्याची खंत डॉ. प्रभुणे यांनी व्यक्त केली. रेल्वे आल्यानंतर खडी फोडण्याची शिक्षा आली, किंबहुना हा वाक्प्रचार रूढ झाला. एकही शोध लावला नाही तरी आपण 'विज्ञान दिन' साजरा करतो. मराठा समाजासह इतर समाजही आरक्षण मागत आहेत. ही त्यांची वृत्ती आहे. असेही डॉ. प्रभुणे यांनी यावेळी नमूद केले. व्याख्यानाच्या समारोपानंतर श्रोत्यांच्या प्रश्नांना डॉ. प्रभुणे यांनी मार्मिक संदर्भ देत उत्तरे दिली. या व्याख्यानमालेला संस्थेचे अध्यक्ष डॉ. विजय बेडेकर, सौ. सुमेधा बेडेकर त्याचसोबत संस्थेचे इतर पदाधिकारी १३४ विद्यार्थी व १४ शिक्षक उपस्थित होते. सोबतच अनेक हितचिंतक आणि मान्यवर नागरिक या व्याख्यानमालेला आवर्जून उपस्थित होते.

दि. २ डिसेंबर २३ रोजी लोकसत्ता लोकांकिका स्पर्धेच्या ठाणे क्षेत्रीय फेरीचे आयोजन ठाण्याच्या बाळासाहेब ठाकरे हॉल येथे करण्यात आले होते. या स्पर्धेत टॅलेंट आणि कल्चरल समिती तर्फे सहभागी विद्यार्थ्यांनी 'यात्रा' या एकांकीने तिसरा क्रमांक पटकावला. श्रावणी खानविलकर या विद्यार्थिनीने अभिनयाचा सर्वोत्कृष्ट अष्टपैलू पुरस्कार पटकावला. यात एकूण २९ विद्यार्थी व ४ स्वयंसेवक सहभागी होते.

तत्त्वज्ञान आणि मानसशास्त्र विभागातर्फे दि. २ डिसेंबर २३ रोजी जैविक परिप्रेक्षाच्या सहाय्याने 'मस्तिष्क अभ्यास' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. सदर व्याख्यानाला प्रा. वेदवती परांजपे यांनी मार्गदर्शन केले. या व्याख्यानाला एकूण ३२ विद्यार्थी उपस्थित होते. मेंदूची जैविक कार्ये, न्युरोंस, मेंदूचा भाग तसेच त्याचा मानसशास्त्राच्या दृष्टिकोनातून अभ्यास याची माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली.

आंतरराष्ट्रीय विकलांगता दिवसाचे औचित्य साधून महाविद्यालयाच्या 'अतुल्य सेल' तर्फे आभासी मंचाद्वारे व्याख्यानाचे आयोजन दि. ३ डिसेंबर २०२३ रोजी करण्यात आले होते. रिया चांदोरकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. दिव्यांग विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाच्या विविध उपक्रमांत सक्रिय सहभागाचे महत्त्व अधोरेखित केले, त्याचसोबत महाविद्यालय अतुल्य सर्वसमावेशक सेल माध्यमातून राबवत असलेल्या उपक्रमांची प्रशंसा केली. सदर व्याख्यान सर्वांसाठी खुले होते. इतर महाविद्यालयांचे विद्यार्थी, पालक, स्वयंसेवक यात सहभागी झाले.

**सांगाड्यांच्या विश्वातील सफर..**

ठाणे येथील प्राच्यविद्या अभ्यास संस्थेतर्फे दि. १२ डिसेंबर २०२३ रोजी 'Anthropology for Archaeology: An Introduction' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते, या व्याख्यानाच्या प्रमुख वक्त्या डॉ. वीणा मुश्रीफ-त्रिपाठी डेक्कन कॉलेज पोस्ट ग्रॅज्यूएट अँड रिसर्च इन्स्टिट्यूट, पुणे येथे प्राध्यापिका आहेत. मानववंशशास्त्र, व पुरातत्त्वशास्त्र याविषयी त्यांचा अभ्यास आहे. डेक्कन कॉलेज व अनेक नामांकित संस्थांच्या उत्खनन उपक्रमात त्यांचा सहभाग असतो.

हे व्याख्यान विद्या प्रसारक मंडळाच्या डॉ. वा. ना बेडेकर व्यवस्थापन संस्थेतील पाणिनी सभागृहात पार पडले. कार्यक्रमाच्या सुरवातीला प्राच्यविद्या संस्थेने इतिहास व भारतीय संस्कृती जपण्यासाठी, विद्यार्थ्यांमधे संशोधक वृत्ती रुजवण्यासाठी व जनमानसात याविषयी जागरूकता पसरविण्यासाठी हाती घेतलेल्या विविध उपक्रमांची ओळख करून देण्यात आली.

विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. विजय बेडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली, प्राच्यविद्या संस्था अनेक व्याख्यान, प्रदर्शन, हेरिटेज वॉक अशा अनेकविविध

उपक्रमांचे आयोजन करत असते. लवकरच प्राच्यविद्या अभ्यास संस्थेतर्फे मानववंशशास्त्र आणि पुरातत्त्वशास्त्राशी संबंधित एक नावीन्यपूर्ण कोर्स सुरू होणार आहे, ज्यात विद्यार्थ्यांना दफनभूमीची उत्खनन पद्धती आणि त्यात मिळणाऱ्या मानवी हाडांच्या अभ्यासाविषयीचे विशेष प्रशिक्षण देण्यात येईल असे आजच्या कार्यक्रमात जाहीर करण्यात आले.

इतिहास, भारतीय संस्कृती, मानववंशशास्त्र या विषयी विद्यार्थ्यांमध्ये रुची निर्माण व्हावी आणि यासंबंधी त्यांना तज्ज्ञ व्यक्तींचे मार्गदर्शन लाभावे या हेतूने हे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. संस्थेचे अध्यक्ष डॉ. विजय बेडेकर, अनेक विद्यार्थी, प्राध्यापक, व ठाण्यातील प्रतिष्ठित नागरिक या कार्यक्रमासाठी उपस्थित होते. व्याख्यानानंतर प्रश्न-उत्तर सत्र पार पडले व कार्यक्रमाची सांगता पसायदानाने झाली.

**दिनांक ३, ४, ५ डिसेंबर २०२३ रोजी SURGE माजी विद्यार्थी संघटनेची विद्या प्रसारक मंडळाच्या वेळणेश्वर, गुहागर येथील महर्षी परशुराम अभियांत्रिकी महाविद्यालयाला भेट.**

SURGE या जोशी- बेडेकर महाविद्यालय, ठाणे या माजी विद्यार्थी संघटनेच्या राजेंद्र साळवी, स्वप्नील मयेकर, प्रदीप जगताप, नारायण कदम, सुदाम अहिरराव या समिती सदस्यांनी वेळणेश्वर, तालुका गुहागर, जिल्हा रत्नागिरी येथील विद्या प्रसारक मंडळाच्या महर्षी परशुराम अभियांत्रिकी महाविद्यालयास दिनांक ३, ४ आणि ५ डिसेंबर, २०२३ रोजी सदिच्छा भेट दिली.

सर्ज समिती सदस्यांनी वेळणेश्वर अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या विविध विभागांना भेट दिली.

यात विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष प्रशिक्षणाचे दृष्टीने अतिशय सुसज्ज असे मशीनरूम्स, इन्स्ट्रुमेंट रूम्स, कॉन्फरेन्स रूम, प्रशस्त लायब्ररी, कॉम्प्युटर रूम, केमिस्ट्री लॅब अशा विविध डिपार्टमेंटस त्याचबरोबर इंजिनीअरिंगच्या मेकॅनिकल, इलेक्ट्रिकल, इन्स्ट्रुमेंटशन इत्यादी फॅकल्टीच्या दरवर्षी एकूण १८० नव्या अ‍ॅडमिशनची सुविधा असलेले अतिशय अद्ययावत क्लास रूम्स यांचा समावेश होता.

सुमारे ४० एकरच्या अतिशय विस्तीर्ण अशा भूखंडावर कॉलेजच्या अतिशय भव्य अशा ३ वास्तूंव्यतिरिक्त विद्यार्थी आणि विद्यार्थिनी यांच्यासाठी ज्ञानेश्वरी १,२,३,४ अशा स्वतंत्र निवासी सदनिका, विद्यार्थ्यांसाठी सुसज्ज उपहारगृह, सर्व्हर रूम, क्रीडा विभागामध्ये इनडोअर बॅडमिंटन, टेबल टेनिस, कॅरम अशा विविध खेळांची सुविधा आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे सुसज्ज जिम येथे आहे. येथील नाना फडणवीस सभागृहामध्ये मोठे स्टेज असून, (ऑडिटोरिम ) ४५०-५०० आसनव्यवस्था असून, तेथील उपहारगृह ही अतिशय स्वच्छ आणि प्रशस्त आहे. विद्यार्थ्यांना आवश्यक असलेल्या सर्व सुविधांचा विचार संस्थेने केला असल्याचे जाणवले.

दिनांक ५ डिसेंबर २०२३ - जोशी बेडेकर महाविद्यालयाने मुंबई विद्यापीठाने आयोजित 'आविष्कार संशोधन अधिवेशन' २३ मध्ये प्रथम क्रमांक पटकावत मुंबई विद्यापीठाचे प्रतिनिधित्व आंतरविद्यापिठीय फेरीसाठी करणार.

मुंबई विद्यापीठाने आयोजित केलेल्या आंतर महाविद्यालयीन आविष्कार संशोधन अधिवेशन २०२३ ची फेरी दि. ५ डिसेंबर २३ रोजी पार पडली. यात जोशी बेडेकर महाविद्यालयाने सहभाग नोंदवला. १८ प्रकल्पांसह एकूण ५४ यात सहभागी झाले होते. सहभागी झाले होते. यातील ५ प्रकल्प पुढील फेरीसाठी निवडण्यात आले. यात ३ पदव्युत्तर तर २ पदवी विभागातील होते.

या ५ प्रकल्पांतील २ प्रकल्पांची निवड पुढील फेरीसाठी करण्यात आली. अंतिम फेरी १७ डिसेंबर आणि २२ व २३ डिसेंबर रोजी पार पडली. यात महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी प्रथम क्रमांक पटकावला. सदर विद्यार्थी मुंबई विद्यापीठाचे प्रतिनिधित्व आंतरविद्यापीठीय फेरीसाठी करणार आहेत.

'आंतरराष्ट्रीय विकलांगता दिवस सप्ताह' औचित्य साधून जोशी - बेडेकर महाविद्यालयाच्या 'अतुल्य सर्वसमावेशक सेल' तर्फे दि. ७ डिसेंबर २३ रोजी आंतरमहाविद्यालयीन क्विझ प्रतियोगिता आयोजित करण्यात आली होती.

ठाणे महानगर पालिका तर्फे आंतरराष्ट्रीय विकलांगता दिनाचे औचित्य साधून जोशी - बेडेकर महाविद्यालयात उपक्रमाचे आयोजन दि. ८ डिसेंबर २३ रोजी करण्यात आले होते. महाविद्यालयाचे अतुल्य सर्वसमावेशक सेल व ठाणे महानगर पालिका शिक्षण समिती यात सहभागी होते.

विद्यार्थ्यांच्या मनातील मंचावर वावरतानाची भीती कमी करणे, आत्मविश्वास निर्माण करणे, बाहेरच्या जगाचे ज्ञान करून देणे या उद्देशाने हा उपक्रम राबवण्यात आला होता.

जोशी बेडेकर महाविद्यालयाच्या B.com. विभागातर्फे ठाणे न्यायालय - लोकअदालत समजून घेण्यासाठी भेट देण्यात आली. दि. ९ डिसेंबर २३ रोजी या भेटीचे आयोजन करण्यात आले होते. यात एकूण १८ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. विद्यार्थ्यांना लोकअदालत न्याय प्रक्रियेची माहिती करून देण्याच्या उद्देशाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

अतुल्य सेल स्वयंसेवक गार्गी नागवेकर हिने सदर उपक्रमाचे सूत्रसंचालन केले. यात एकूण १७ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. यातील ३ विद्यार्थ्यांची विजेता म्हणून निवड करण्यात आली. या सप्ताहात घेण्यात आलेल्या उपक्रमाचे बक्षीस वितरण कात्यायन सभागृह येथे दि.१४ डिसेंबर २३ रोजी करण्यात आले.

महाविद्यालयाच्या अतुल्य सर्वसमावेशक सेल तर्फे आंतरराष्ट्रीय विकलांगता दिन सप्ताहाच्या समारोप कार्यक्रमाचे आयोजन दि. १४ डिसेंबर २३ रोजी कात्यायन सभागृहात करण्यात आले होते. यावेळी सुमन दळवी आणि अंब्रिन शेख यांची विशेष निमंत्रित म्हणून उपस्थिती होती.

तर प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांनी प्रमुख पाहुणे म्हणून मार्गदर्शन केले. यावेळी एकूण ८० विद्यार्थी उपस्थित होते.

अतुल्य सर्वसमावेशक सेलने डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यापासून 'आंतरराष्ट्रीय अपंग दिना'निमित्त अनेक कार्यक्रम आणि स्पर्धांचे आयोजन केले होते.

- यात अतिथी व्याख्यान, निबंध, प्रश्नमंजुषा, गायन, पोस्टर, वाद्य, व्यक्तिमत्त्व (मिस्टर आणि मिसेस अतुल्य) इंट्रा तसेच आंतर-महाविद्यालयीन स्पर्धांचा समावेश होता.
- समापन कार्यक्रमात कॉन्फिडन्स रॅम्प वॉक, अतुल्य विद्यार्थ्यांनी सादर केलेले सोशल मीडियाच्या गैरसोयींवरील स्किट, फिश पॉन्ड गेम, अनुभव शेअरिंगचा समावेश होता ज्यात बक्षीस वितरण होते.
- शिक्षणातील सर्वसमावेशकतेबाबत जनजागृतीसाठी पोस्टर्स आणि ब्रेल पुस्तके, क्रिकेट बॉल इत्यादींसारख्या सर्वसमावेशक वस्तूंचे प्रदर्शनही आयोजित करण्यात आले होते. (मुख्य थीम)


* प्रमुख पाहुणे, प्राचार्य डॉ. सुचित्रा नाईक यांनी खऱ्या अर्थाने यशस्वी होण्याचे आणि सेवेद्वारे समाजाला योगदान देण्यावर भर दिला. त्यांनी अतुल्य शिक्षक, मुख्याध्यापक आणि विद्यार्थ्यांचे अशा नावीन्यपूर्ण उपक्रमाचे अभिनंदन केले.
* समर्थनम ट्रस्टचे प्रतिनिधी व शिक्षक प्रभारी यांनीही यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.
* विविध महाविद्यालयातील विद्यार्थी आणि पुण्यातील ३ दृष्टिहीन विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमात व त्यापूर्वीच्या स्पर्धांमध्ये सहभाग घेतला होता.
* एकूणच कार्यक्रम म्हणजे अतुल्य परिवाराशी संबंधित विद्यार्थी, स्वयंसेवक आणि शिक्षकांचा उत्साही मेळावा वाटला. कार्यक्रमानंतर स्नेहभोजन झाले.


जोशी - बेडेकर महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना (NSS) युनिटच्या सात दिवसीय निवासी शिबिराचे आयोजन दि. १५ डिसेंबर २३ ते २१ डिसेंबर २३ रोजी उंबरमाळी, शहापूर येथे करण्यात आले होते. या शिबिरात १०० विद्यार्थी सहभागी झाले होते. सदर विद्यार्थ्यांनी श्रमदानातून गावातील उकिरड्याची जागा, कचराकुंडी यांची साफसफाई करत स्वच्छता अभियान राबवले. गावतील विद्यार्थ्यांची गणित, इंग्रजी, विज्ञान या विषयाची प्रगती होण्याच्या अनुषंगाने विद्यार्थ्यांनी विशेष वर्ग आयोजित करत विद्यार्थ्यांचे अध्यापन केले. त्याचसोबत गावातील शाळेतील विद्यार्थ्यांना चरखा माध्यमातून सूत-कताई दाखवण्यात आली. विद्यार्थ्यांसाठी अनेक खेळ, स्पर्धा आयोजित करण्यात आल्या. या निवासी कॅम्प मधील विद्यार्थ्यांसाठी अनेक तज्ज्ञ मार्गदर्शकांची व्याख्याने आयोजित करण्यात आली होती. विद्यार्थ्यांनी स्वावलंबनाचे धडे गिरवत सदर शिबिराचे मर्म समजून घेतले. सदर शिबिराला प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक, उपप्राचार्या डॉ. प्रियंवदा टोकेकर, त्याचसोबत अनेक विभागप्रमुख, प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी भेट दिली.

## बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय (स्वायत्त)

### आंतरराष्ट्रीय माकड दिन

प्राणिशास्त्र विभागातर्फे 'आंतरराष्ट्रीय माकड दिन' १४ डिसेंबर २०२३ रोजी साजरा करण्यात आला. यानिमित्ताने तृतीय वर्ष विज्ञान शाखेची विद्यार्थिनी कु. प्रांजल बागवे  पॉवर पॉईंट सादरीकरणाच्या माध्यमातून, तर द्वितीय वर्ष विज्ञान शाखेचा विद्यार्थी कु. हरीश तिवारी याने छोट्याशा नाट्कलीच्या माध्यमातून माकडांचे खाणे, विविध प्रजाती, इतर प्राण्यांशी वागणे याबद्दल माहिती दिली. यावेळी माकडांबद्दलची शॉर्ट फिल्म दाखवण्यात आली. तसेच माकडांच्या जीवनशैलीबद्दल प्रश्नमंजुषा देखील घेण्यात आली. या कार्यक्रमाला ६४ विद्यार्थी हजर होते.






### संख्याशास्त्र विभाग

संख्याशास्त्र विभागाच्या संख्या क्लबतर्फे विद्यार्थ्यांना संशोधन प्रकल्प तयार करण्याच्या दृष्टीने उपयुक्त संशोधन प्रकल्प सादरीकरण हा उपक्रम ४ नोव्हेंबर २०२३ रोजी आयोजित करण्यात आला होता. द्वितीय व तृतीय वर्ष विभागाच्या विद्यार्थ्यांनी संशोधन प्रकल्प सादर केले. यावेळी डॉ. दिव्या नायर, सहाय्यक प्राध्यापक, कम्युनिटी मेडिसिन विभाग, टी एन मेडिकल कॉलेज व बी वाय एल चारीटेबल हॉस्पिटल यांनी विद्यार्थ्यांचे मूल्यमापन केले व त्यांना मार्गदर्शन केले.



### जैव रसायनशास्त्र व सूक्ष्मजीवशास्त्र

जैव रसायनशास्त्र व सूक्ष्मजीवशास्त्र विभागातर्फे ३० नोव्हेंबर २०२३ रोजी 'Career opportunities in Biological sciences and allied fields' या विषयावर डॉ सुशांत परब, पोस्ट डॉक्टरल रिसर्च फेलो, युनिव्हर्सिटी ऑफ टोरिनो इटली यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. बायोलॉजिकल सायन्स व बायोइन्फर्मेटिक्स या विषयांमधील परदेशातील नोकरीच्या संधी याबद्दल डॉ सुशांत यांनी मार्गदर्शन केले. तसेच विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसन केले. या व्याख्यानाला १३५ विद्यार्थी हजर होते.

जैव रसायनशास्त्र व सूक्ष्मजीवशास्त्र विभागातर्फे ११ डिसेंबर २०२३ रोजी माजी विद्यार्थी श्री सुभाष खत्री यांचे Career Guidance या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. 'जैव रसायनशास्त्र व सूक्ष्मजीवशास्त्र' या विषयातील संशोधनाच्या संधी, तसेच सोशल मीडियाचा वापर करून विविध कंपनीमध्ये देखील नवनवीन संधी कशा मिळू शकतात याबद्दल चर्चा केली. यावेळी त्यांनी स्वतःचा पीएचडीचा प्रवास मांडला.



### ग्रंथालय विभाग

डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त ग्रंथालय विभागातर्फे त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केला व त्यांच्यावरील माहितीचे, तसेच पुस्तकांचे प्रदर्शन ६ डिसेंबर २०२३ रोजी भरवण्यात आले होते.




थोर गणितज्ञ श्रीनिवास रामानुजन यांच्या १३६ व्या जयंतीनिमित्त २२ डिसेंबर २०२३ रोजी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केला. तसेच गणित विषयावरील पुस्तकांचे प्रदर्शन भरवण्यात आले होते.



## विद्या प्रसारक मंडळाचे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय

- १५-११-२०२३ रोजी NAAC पीअर टीम महाविद्यालयाला भेट देणार असल्याची तारीख महाविद्यालयास नॅक द्वारे कळविण्यात आली. NAAC पीअर टीम भेट तारीख : १४, १५ डिसेंबर २०२३

- **माजी विद्यार्थ्यांचे यश**


माननीय न्यायमूर्ती मुंबई हायकोर्ट श्रीमती शर्मिला



देशमुख ह्या देखील महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थी आहेत. जुलै २०२२ मध्ये त्यांनी पदभार स्वीकारला. (बॅच - १९९२)



माजी विद्यार्थी श्री विनोद आरे ह्यांची विशेष सरकारी वकील म्हणून नियुक्ती झाली. (बॅच - २०१५)



श्री अनिरुद्ध प्रकाश मांडलिक ह्याने २०२३ मध्ये लंडन येथून LL.M. चे शिक्षणासाठी प्रवेश घेतला आहे. (बॅच - २०२३)

- **विद्यापीठाच्या परीक्षा वेळापत्रक सेमिस्टर IV आणि सेमिस्टर II**

| | सेमिस्टर-IV | सेमिस्टर-II | |
|---|---|---|---|
| **तारीख** | **विषय** | **विषय** | **वेळ** |
| २/११/२०२३ | न्यायशास्त्र | – | १०.३० स. ते १.३० दु. |
| ३/११/२०२३ | – | भारतीय दंड संहिता | १०.३० स. ते १.३० दु. |
| ४/११/२०२३ | करार- दोन | – | --”-- |
| ६/११/२०२३ | – | घटनात्मक कायदा | --”-- |
| ७/११/२०२३ | | जमीन कायदा | --”-- |
| ८/११/२०२३ | – | कौटुंबिक कायदा-एक | --”-- |
| ९/११/२०२३ | गुन्हेगारी/ कर आकारणी/ दिवाळखोरी | – | १०.३० स. ते १.३० दु. |
| २०/११/२०२३ | – | पर्यावरण कायदा | १०.३० स. ते १.३० दु. |

- **३ नोव्हेंबर २०२३ – समुद्र विषयीचे कायदे विशेष व्याख्यान :**

समुद्राचे नियम डॉ. शास्त्री यांचे विशेष व्याख्यान – सरांनी समुद्राच्या स्वातंत्र्याची संकल्पना स्पष्ट करून २० व्या शतकापासून समुद्राचा वापर कसा होता हे सांगितले. युनायटेड नेशन्स कन्व्हेन्शन ऑफ लॉ ऑफ सी आणि विविध सागरी क्षेत्रांच्या विभाजनाचे सविस्तर स्पष्टीकरण उत्तम पॉवर पॉइंट सादरीकरणाच्या मदतीने देण्यात आले. समुद्रासंबंधीचे विविध वाद कसे सोडवले जातात, हेही सरांनी समजावून सांगितले. समुद्राच्या संपूर्ण नियमाची जशी एक गोळीच त्यांनी दिली.



- **४ नोव्हेंबर – ई-फायलिंग कार्यशाळा :**

४ नोव्हेंबर रोजी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांसाठी ‘ई – फायलिंग’ या विषयावर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. ठाणे जिल्हा न्यायालय येथील सिस्टम अधिकारी श्री गुरुनाथ माने यांनी सदर कार्यशाळेमध्ये मार्गदर्शन केले.

अत्तर सुगंधी व्हायला फुले सुगंधी असावी लागतात.

- **५ नोव्हेंबर रोजी विधि फाऊंडेशन आणि विधि बंध आयोजित व्याख्यान :**

५ नोव्हेंबर, रविवारी विधि फाऊंडेशन आणि विधि बंध यांनी संयुक्तपणे माननीय न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग आणि दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ विभाग श्रीमती अपूर्वा भास्कर यांच्या वतीने आगामी वकिलांकडून खंडपीठाच्या अपेक्षा याविषयी व्याख्यान आयोजित करण्यात आले.

- ७ नोव्हेंबर प्रभारी मुख्याध्यापिका श्रीमती श्रीविद्या जयकुमार यांनी मुंबई येथील प्रवेश नियमन प्राधिकरण, एक्सेलसियर बिल्डिंग येथे प्रवेश नियमन प्राधिकरणाचे संचालक श्री डांगे यांची भेट घेतली.

- **८ नोव्हेंबर, संध्याकाळी ५ ते ७ वाजता श्री. नीतिन पागी यांचे 'वकीलांसाठी अकाउंटन्सी' या विषयावर विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले.**




- **८ नोव्हेंबर कायदा जागृती स्पर्धा**

रोजी महाविद्यालयामध्ये कायदा जागृती स्पर्धाचे आयोजन Legal Aid Cell च्या माध्यमातून आले होते. यावेळी विद्यार्थांनी 'RTE, RTI व इतर विषयावर नाट्यमय पद्धतीने जागृती कशी आणावी' या विषयावर प्रदर्शन केले.

- **मराठी शिकवणी वर्ग :**

नोव्हेंबर महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यामध्ये तृतीय विधी विद्यार्थ्यांसाठी मराठी भाषेतून शिकवणी घेण्यात आली. यावेळेस संबंधित प्राध्यापकांनी त्यांच्या - त्यांच्या विषयावर मराठी मध्ये शिकवणी घेतली.

| वेळ | दिनांक | विषय | शिक्षक |
|---|---|---|---|
| २.३० ते ४.३० | ७/११/२०२३ | मानवी हक्क संरक्षण | डॉ श्रीविद्या जयाकुमार व प्रा कृष्णा कामत |
| २.३० ते ४.३० | ८/११/२०२३ | दिवाणी प्रक्रिया संहिता | प्रा. अंबर जोशी |
| २.३० ते ४.३० | ९/११/२०२३ | फौजदारी प्रक्रिया संहिता | प्रो. विनोद वाघ व प्रा. विद्या गायकवाड |
| २.३० ते ४.३० | ९/११/२०२३ | कायद्याचे स्पष्टीकरण | डॉ. महेश बर्वे व प्रा.हेतल मिशेरी |

- **९ नोव्हेंबर, संध्याकाळी ५ ते ७ वाजता ॲड. मनोज भट्ट यांचे 'न्यायालयाचा अवमान कायदा' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले.**

यावेळी श्री. मनोज भट्ट यांनी न्यायालयाचा अवमान कसा होतो हे स्पष्ट केले. न्यायालयाचा अवमान न्यायालयीन संस्थांना प्रेरित हल्ले आणि अवास्तव टीका यापासून संरक्षण देण्याचा प्रयत्न करते. न्यायालयाचा अवमान कायदा, १९७१ हे वैधानिक समर्थन म्हणून स्पष्ट केले आहे. त्याच्या बचावासह दिवाणी आणि फौजदारी सारख्या विविध प्रकारच्या अवमानांचे तपशीलवार वर्णन केले गेले.

- **९ नोव्हेंबर, कायदेविषयी साक्षरता जागरूकता रॅली :**

जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, ठाणे यांच्यामार्फत ९ ते १४ नोव्हेंबर २०२३ या कालावधीत कायदेशीर साक्षरता आणि मोठ्या प्रमाणावर कायदेशीर जागृती निर्माण करण्यासाठी राष्ट्रीय विधी सेवा सप्ताह साजरा

करण्यात आला. दरवर्षी दि. ९ नोव्हेंबर रोजी सर्व राज्य अधिकारी विधी सेवा दिन साजरा करतात. या दिवसाचे औचित्य साधून जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, ठाणे यांच्या वतीने कायदेशीर जनजागृती रॅली काढण्यात आली. सकाळी ८.०० वाजता जिल्हा व सत्र न्यायालय ठाणे येथून रॅलीला सुरुवात झाली. परिसरातील अनेक विधी महाविद्यालय जसे, आनंद विश्व गुरुकुल कॉलेज ऑफ लॉ, एस.टी. ऍंग्रेल स्कॉल ऑफ लॉ, ठाणे नर्सिंग कॉलेज' आदी या कायदेशीर साक्षरता रॅलीत सहभागी झाले होते. प्रभारी प्राचार्य डॉ. श्रीविद्या जयकुमार व विद्यार्थ्यांसह सहाय्यक प्रा. कृष्णा कामथ रॅलीला उपस्थित होते.

रॅलीला सुरुवात होण्यापूर्वी माननीय जिल्हा व सत्र न्यायाधीश श्री. ईश्वर सूर्यवंशी यांनी रॅलीत मोठ्या संख्येने सहभागी झालेल्या सर्व विद्यार्थी, शिक्षक, पोलिस अधिकारी व न्यायालयातील इतर कर्मचाऱ्यांचे स्वागत केले व त्यांच्या उपस्थिती बद्दल त्यांचे आभार मानले व त्यांचे कौतुक केले प्रा. कृष्णा कामथ यांनीही सर्वांचे स्वागत केले व सर्व महाविद्यालयांसोबत समाजात सातत्याने कायदेशीर जागृती निर्माण करण्याची शपथ घेतली.

ही रॅली चिंतामणी सर्कल, टेंभीनाका येथून मार्गक्रमण करून परत ठाणे न्यायालयात आली. रॅलीदरम्यान विद्यार्थ्यांनी फलक झळकावून आणि पथनाट्य सादर करून जनजागृती केली. आमच्या महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी घरगुती हिंसाचाराच्या मुद्यावर जनजागृती करण्यासाठी एक प्रभावी पथनाट्य देखील सादर केले आणि आमच्या महाविद्यालयात उपलब्ध असलेल्या मोफत कायदेशीर मदत केंद्राबद्दल सर्वांना माहिती दिली. रॅलीच्या शेवटी सर्व सहभागींसाठी जिल्हा व सत्र न्यायालय ठाणे यांच्या वतीने अल्पोपहाराची व्यवस्था करण्यात आली होती.




- **III LLB प्रात्यक्षिक –** प्रशिक्षण, १, २, ३, ४, ६, ७, ८, ९, २४, २५, २८ नोव्हेंबर रोजी संध्याकाळी ६ ते ७ या वेळेत घेण्यात आले. शिक्षक : प्रा. डॉ. श्रीमती श्रीविद्या जयकुमार

- सौ. रश्मी नाटेकर बीएससी एलएलएम (सेट), व्हिजिटिंग फॅकल्टी ह्यांना त्यांच्या विनंती वरून त्यांच्या कर्तव्यातून मुक्त करण्यात आले. त्यांची लॉ सीखो येथे शिक्षिका म्हणून नियुक्ती झाली आहे.

- **१८ नोव्हेंबर तृतीय वर्षाची पूर्वतयारी परीक्षा**

तृतीय विधीची सत्र पाच ची पूर्वतयारी परीक्षा Online पद्धतीने घेण्यात आले. त्यावेळी प्रश्न-पत्रिका वर चर्चा करून शिक्षकांनी मार्गदर्शन केले.

| वेळ | दिनांक | विषय | शिक्षक |
|---|---|---|---|
| ५.०० ते ७.०० ऑनलाइन | २१/११/२०२३ | मानवी हक्क संरक्षण | डॉ श्रीविद्या जयाकुमार व प्रा कृष्णा कामत |

| | | | |
|---|---|---|---|
| २.३० ते ४.३० ऑनलाइन | २०/११/२०२३ | दिवाणी प्रक्रिया संहिता | प्रा. अंबर जोशी |
| ५.०० ते ७.०० ऑनलाइन | २०/११/२०२३ | फौजदारी प्रक्रिया संहिता | प्रो. विनोद वाघ |
| २.३० ते ४.३० ऑनलाइन | २१/११/२०२३ | कायद्याचे स्पष्टीकरण | डॉ. महेश बर्वे व प्रा. हेतल मिशेरी |

**२ आणि ३ डिसेंबर २०२३ रोजी फ्रेशरचे वादविवाद, वक्तृत्व आणि मूट कोर्ट पुढे ढकलण्यात आले कारण तेथे फक्त २ नोंदी होत्या.**

**विधी महाविद्यालयास मिळाले दुसऱ्यांदा नॅक चे मानांकन**

शब्दांकन : प्रा. विनोद एच वाघ IQAC Coordinator

विद्या प्रसारक मंडळाचे टीएमसी विधी महाविद्यालय यांना २००४ मध्ये NAAC या संस्थेकडून मानांकन प्राप्त झाले होते. मुंबई विद्यापीठ अंतर्गत येणाऱ्या एकूण विधी महाविद्यालयांपैकी मंडळाचे महाविद्यालय हे एकमेव NAAC मानांकन असलेले महाविद्यालय होते. जवळपास २०२० पर्यंत मुंबई विद्यापीठामध्ये संस्थेचे महाविद्यालय एकमेव NAAC मानांकन असलेले महाविद्यालय होते. पुन्हा एकदा NAAC मानांकन मिळावे या उद्देशाने २०२१-२२ या शैक्षणिक वर्षांमध्ये महाविद्यालयाने NAAC मानांकनाची प्रक्रिया सुरू केली. यासाठी आवश्यक असलेले सहकार्य व मार्गदर्शन विद्या प्रसारक मंडळाच्या व्यवस्थापक मिळाले, विशेषतः संस्थेची कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर, डॉ. महेश बेडेकर यांचे सहकार्य व मार्गदर्शन विशेष महत्त्वाचे होते. महाविद्यालयामध्ये असलेले सर्व आवाहन पूर्ण करत महाविद्यालयाने २०२१-२२ पर्यंतचे पूर्ण अहवाल NAAC सादर केले व आवश्यक असलेली सर्व प्रक्रिया पूर्ण करून व आवश्यक असलेले शुल्क भरून NAAC च्या सदस्यास तपासणीसाठी निमंत्रित केले. NAAC नियमाप्रमाणे सर्व AQAR पूर्ण करून IIQA व SSR दाखल केले. महाविद्यालयाने दाखल केलेले सर्व अहवाल यांची दखल घेऊन NAAC संस्थेने दिनांक १४ व १५ डिसेंबर २०२३ रोजी महाविद्यालयात भेट देण्याचे ठरविले. NAAC च्या नियमाप्रमाणे तपासणी पूर्व आवश्यक असलेली सर्व प्रक्रिया महाविद्यालयाने वेळेमध्ये पूर्ण केली. महाविद्यालयास अंतर्गत असलेल्या सर्व आव्हानाला स्वीकारून, मंडळाच्या मार्गदर्शनाप्रमाणे विविध प्रकारच्या समिती तयार करून व त्याची पूर्वतयारी करून महाविद्यालयाने NAAC भेटीची तयारी पूर्ण केली. दिनांक १३ डिसेंबर २०२३ रोजी महाविद्यालयाचे प्राध्यापक व विद्यार्थी यांनी NAAC च्या सदस्याचे स्वागत मुंबई एअरपोर्टवर केले. NAAC च्या नियमाप्रमाणे दिनांक १३ डिसेंबर २०२३ रोजी रात्री दहा वाजता झिरो मीटिंगचे आयोजन करण्यात आले होते ज्यामध्ये संस्थेचे अध्यक्ष डॉ. विजय बेडेकर, प्रभारी प्राचार्य डॉ. श्रीविद्या जयकुमार व IQAC कोऑर्डिनेटर प्रा. विनोद वाघ हजर होते. दिनांक १४ डिसेंबर २०२३ रोजी सकाळी पावणे नऊच्या दरम्यान NAAC सदस्य यांचे महाविद्यालयामध्ये महाराष्ट्राच्या संस्कृतीप्रमाणे ढोल लेझीमच्या तालामध्ये स्वागत करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने या स्वागतामध्ये सहभाग नोंदवला. त्यानंतर महाविद्यालयाच्या प्रियांबल वॉल समोर NAAC च्या सदस्यांचे प्रभारी प्राचार्य यांच्या माध्यमातून स्वागत व अभिनंदन करण्यात आले. NAAC या नियमाप्रमाणे व दिलेल्या वेळ पत्रकाप्रमाणे एकूण तपासणी करण्यात आली. महाविद्यालयाने यावेळी माजी विद्यार्थी, विद्यार्थ्यांचे पालक, तसेच माजी शिक्षक वर्ग यांना पाचारण करण्यात आले होते. NAAC ज्या सदस्यांनी या सर्वांशी हितगूज व चर्चा केली. दुपारी एक वाजता सर्वांसाठी जेवणाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी संस्थेचे सदस्य, तसेच विद्यापीठ व शासनाचे

प्रतिनिधी देखील हजर होते. यावेळी NAAC चार सदस्यांनी महाविद्यालयामध्ये असलेले सर्व व्यवस्था व सुविधा यांची तपासणी केली. यामध्ये वर्ग खोल्या, मूठकोट हॉल, जिने, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, संगणक रूम, ग्रंथालय, जिमखाना, कॅन्टीन व प्रांगणामध्ये असलेले मैदान आणि सभागृह यांना भेट दिली. सायंकाळी साडेपाच वाजता सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन पाणिनी सभागृह येथे करण्यात आले. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी शास्त्रीय नृत्य, लावणी व कायद्याची माहिती देणारे नाट्य सादर केले. या सांस्कृतिक कार्यक्रमाचे अभिनंदन व कौतुक NAAC च्या सदस्याद्वारे करण्यात आले. अशाप्रकारे पहिल्या दिवसाचा कार्यक्रम पूर्ण करण्यात आला. दिनांक १५ डिसेंबर २०२३ रोजी पुन्हा एकदा सकाळी नऊ वाजता NAAC च्या सदस्यांचे आगमन महाविद्यालयात झाले. दुसऱ्या दिवशी देखील NAAC च्या नियमाप्रमाणे सदस्यांनी त्यांना हवी असलेली तपासणी पूर्ण केली. दुपारच्या जेवणानंतर NAAC च्या सदस्यांनी त्यांचा अहवाल लिहिण्यास सुरुवात केली. सायंकाळी सात वाजता एक्झिट मीटिंगचे आयोजन करण्यात आले. यावेळी NAAC च्या सदस्यांनी त्यांचे मनोगत व्यक्त केले व त्यांचा अहवाल बंद लिफाफ्यामध्ये संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर व प्रभारी प्राचार्य डॉ. श्रीविद्या जयकुमार यांना सुपूर्द केला. यावेळी डॉ. विजय बेडेकर यांच्या हस्ते सर्व NAAC सदस्यांचे शाल व श्रीफळ देऊन स्वागत करण्यात आले. या एक्झिट मीटिंगचे आभार प्रदर्शन IQAC कॉर्डिनेटर प्रा. विनोद वाघ यांनी केले. दिनांक २१ डिसेंबर २०२३ रोजी NAAC संस्थेकडून महाविद्यालयास B हे मानांकन दिले गेले. मुंबई विद्यापीठ अंतर्गत असलेल्या एकूण विधी महाविद्यालय पैकी संस्थेचे विधी महाविद्यालय हे एकमेव असे विधी महाविद्यालय आहे ज्यास NAAC या संस्थेकडून दुसऱ्यांदा मानांकन मिळाले आहे. NAAC च्या एकूण कामांमध्ये महाविद्यालयाच्या सर्वच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा मोलाचा वाटा होता. प्रभारी प्राचार्य डॉ. श्रीविद्या जयकुमार, IQAC कॉर्डिनेटर प्रा. विनोद वाघ, ग्रंथपाल शितल सोनावणे, प्रा. हेतल मिशरी, प्रा. कृष्णा कामत, तसेच विजिटिंग फॅकल्टी श्री अंबर जोशी, श्रीमती समता जोशी व इतर शिक्षकांचा सहभाग होता. कार्यालयीन अधीक्षक श्रीमती रंजन करंदीकर, श्री मुकेश राणे, श्री रामेश्वर चव्हाण, श्री किरण डगळे, श्री संतोष बोरघरे, श्री संतोष जुगरे, श्री शुभम पवार, श्री राकेश पाथरे, श्रीमती पाथरे, श्रीमती संगिता पवार व इतर सर्वांचे सहकार्य यावेळेस मिळाले. NAAC संस्थेद्वारे मिळालेल्या मानांकना मध्ये संस्थेच्या सदस्यांचा व कार्याध्यक्षांचा मोठा मोलाचा वाटा आहे. यावेळेस संस्थेच्या इतर महाविद्यालयाच्या प्राचार्य यांचेही मोठे सहकार्य लाभले. या सर्वांचे आभार महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य यांच्याकडून मानण्यात आले.




या NAAC पीअर टीम भेटीसाठी सरकार आणि विद्यापीठ प्रतिनिधी म्हणून सरकारने माजी जर्नल डायरेक्टर श्री विजय नरकेडे यांची नियुक्ती केली; डॉ. श्रीमती सुचित्रा नाईक या माननीय कुलगुरूंनी नामनिर्देशित केलेल्या विद्यापीठाच्या प्रतिनिधी होत्या.

**१७ डिसेंबर २०२३ – माननीय न्यायमूर्ती श्रीमती शर्मिला देशमुख यांची महाविद्यालयास भेट :**

माजी विद्यार्थी लेडीशिप माननीय न्यायमूर्ती श्रीमती शर्मिला देशमुख यांना महाविद्यालयात आमंत्रित

करण्यासाठी प्रभारी प्राचार्य डॉ. श्रीमती श्रीविद्या जयकुमार यांनी मुंबई उच्च न्यायालयात भेट घेतली. रविवार १७ डिसेंबर २०२३ रोजी माननीय न्यायमूर्ती श्रीमती शर्मिला देशमुख यांनी महाविद्यालयाला भेट दिली आणि विधी फाऊंडेशन आणि विद्या प्रसारक मंडळाच्या T.M.C लॉ कॉलेजने आयोजित केलेल्या ॲडव्होकेट हेगडे व्याख्यानमालेत भाग घेतला. महोदया लेडीशिप माननीय न्यायमूर्ती श्रीमती शर्मिला देशमुख यांनी महाविद्यालयाचा आणि माजी विद्यार्थ्यांची संघटना विधिबंध ह्यांच्या द्वारे करण्यात आलेला सत्कार स्वीकारला.

**NAAC मुल्यांकन चा निकाल २० डिसेंबर रोजी जाहीर झाला. महाविद्यालयास 'ब' ग्रेड प्राप्त झाला. आम्ही सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी आणि माजी विद्यार्थी सर्वांचे आभार. महाविद्यालयाने उत्कृष्टतेसाठी काम करण्याचा संकल्प केला आहे.**

### २३ डिसेंबर २०२३ – ठाणे महानगर पालिका आयोजित "विचार मंथन व्याख्यानमाला" :

२६ नोव्हेंबर रोजी झालेल्या संविधान दिनाच्या निमित्ताने तसेच २६ जानेवारी रोजी संविधानास ७४ वर्षे पूर्ण होत असल्याच्या पार्श्वभूमीवर ठाणे महानगर पालिका, ठाणे ह्यांच्या द्वारे दिनांक २३ डिसेंबर रोजी "विचार मंथन व्याख्यानमाला"चे आयोजन करण्यात आले होते. व्याख्यानमालेचा विषय "संविधानाची अमृतमहोत्सवी वाटचाल" असून, वक्ते न्यायमूर्ती (निवृत्त) श्री. सत्यरंजन धर्माधिकारी होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून न्यायमूर्ती अभय ओक (सर्वोच्च न्यायालय) हे लाभले होते. काशिनाथ घाणेकर नाट्यगृह ठाणे येथे सायंकाळी ६.०० वा. पार पडलेल्या ह्या कार्यक्रमास महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्य डॉ. श्रीविद्या जयकुमार तसेच प्रो. विनोद वाघ, प्रो. सुखराम भिसेन, प्रो. समता जोशी ह्यांनी तसेच महाविद्यालयातील ८० विद्यार्थ्यांसह उपस्थिती नोंदविली.




### २६–२७ डिसेंबर २०२३ – इंग्रजी विशेष वर्ग :

महाविद्यालयात इंग्रजी व्याकरण विशेष ऑनलाइन व्याख्यान दिनांक २६, २७ डिसेंबर रोजी आयोजित प्रथम विधी विद्यार्थ्यांसाठी करण्यात आले होते. वि.प्र.मं च्या जोशी बेडेकर महाविद्यालयाच्या प्राध्यापिका श्रीमती पूजा माळवे ह्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. प्रभारी प्राचार्य डॉ. श्रीविद्या जयकुमार यांनी या व्याख्यानाचे आयोजन व सूत्रसंचालन केले.

### २८ डिसेंबर २०२३ रोजी वक्तृत्व आणि वाद–विवादसाठी सादरीकरणावर ऑनलाइन मार्गदर्शन

महाविद्यालयाची माजी विद्यार्थिनी Adv. सोनिया मिश्रा हिने विद्यार्थ्यांना वक्तृत्व आणि वाद–विवादासाठी स्पर्धांसाठी मार्गदर्शन केले. सोनिया हिने आपल्या महाविद्यालयीन कार्यकाळात महाविद्यालयासाठी अनेक पारितोषके पटकावले होती. प्रभारी प्राचार्य डॉ. श्रीविद्या जयकुमार यांनी ऑनलाइन मार्गदर्शनाची व्यवस्था केली आणि ऑनलाइन मार्गदर्शन कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.



**२९ डिसेंबर : माजी विद्यार्थी माननीय जिल्हा न्यायाधीश डॉ. अभय जोगळेकर यांची महाविद्यालयास भेट**

प्राचार्य आणि कर्मचाऱ्यांना भेटण्यासाठी डॉ. अभय जोगळेकर यांनी महाविद्यालयास भेट दिली. त्यावेळी माननीय न्यायमूर्तींनी अनौपचारिकपणे विद्यार्थ्यांची भेट घेतली व न्यायव्यवस्थेतील करिअरवर मार्गदर्शन केले.

## विद्या प्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतन

### तंत्रनिकेतनातील कलागुणांना मिळालेला रंगमंच: पॉलीस्पार्क २४

तंत्रज्ञान शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी सांस्कृतिक स्नेहसंमेलन ही खरंच एक पर्वणीच असते. कारण दर ६ महिन्यांत अवघड विषयांचा अभ्यास करून त्यांचे टर्मवर्क, परीक्षा संपवावी तर लगेच दुसरे सत्र सुरू. यातूनही सवड काढून दरवर्षी ह्या संमेलनात विद्यार्थी आवर्जून भाग घेतात. यंदाचे स्नेहसंमेलन 'पॉलीस्पार्क २४' दि. २६ डिसेंबर ते ३० डिसेंबर या चार दिवसांत अतिशय उत्साहात साजरे झाले. पहिल्या दिवशी रांगोळी, चित्रकला आणि मेहंदी या स्पर्धांचे आयोजन केले होते. तंत्रज्ञानातील उपकरणांवर काम करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या हातातील कला किती सुंदर साकार होऊ शकते यांचा अनुभव सगळ्यांना आला. या स्पर्धेचे परीक्षण करणाऱ्या 'संस्कार भारती' ठाणे समितीच्या ज्येष्ठ रांगोळी कलाकार सुचित्रा जोशी यांनी विद्यार्थ्यांचे मनापासून कौतुक केले.



दुसऱ्या दिवशी विद्यार्थ्यांची चित्रपटसृष्टीची विशेष आवड लक्षात घेऊन 'बॉलीवूड डे आणि रॉम्प वॉक' तसेच 'बॉलीवूड क्विज कॉम्पिटिशन' अशा दोन गंमतीदार स्पर्धांचे आयोजन केले होते. वर्षभर गणवेशात येणाऱ्या विद्यार्थी विद्यार्थिनींनी आपल्या आवडत्या कलाकारांच्या पेहेरावात येऊन या स्पर्धांमध्ये आनंदाने भाग घेतला. यासाठी परीक्षक म्हणून हेमंत आणि शिवानी या माजी विद्यार्थ्यांना आमंत्रित केले होते.



तिसरा दिवस संगीत गायन, साडी क्वीन आणि टाय किंग या स्पर्धांसाठी होता. या स्पर्धेच्या तीन फेऱ्या घेतल्या गेल्या. संगीत स्पर्धेचे परीक्षण डॉक कीर्ती आगाशे, गौतमी पुजारे आणि स्वाती जोशी यांनी केलं तर साडी क्वीन आणि टाय किंग या स्पर्धांसाठी एकता पंडित, सुप्रिया परब आणि पूनम कांबळी यांनी केलं. याच दिवशी सेलेब्रिटी अभिनेता, निवेदक, हार्मोनियम वादक विघ्नेश जोशी यांचे एका वेगळ्या विषयावर भाषण आयोजिले होते. विषय होता 'बोलणं ही देखील एक कला आहे'. या भाषणाला अपेक्षेपलीकडे पसंती मिळाली. दीड तास



विघ्नेश जोशी यांनी आपल्या संभाषण कौशल्याने आणि विद्यार्थ्यांना स्टेजवर बोलवून संवाद साधत गुंतवून ठेवलं होतं. भाषण संपल्यावर विघ्नेश जोशी यांच्याबरोबर

सेल्फी घेण्यासाठी विद्यार्थी आणि शिक्षक यांची एकच गर्दी उसळली.

शेवटच्या दिवशीच्या नृत्य स्पर्धेमध्ये तरुणाईची पावलं नृत्याच्या तालावर थिरकली. खूप मोठ्या संख्येनं विद्यार्थ्यांनी सोलो आणि ग्रुप डान्स मध्ये उत्साहानं भाग घेतला होता. या स्पर्धेचं परीक्षण करण्यासाठी संस्कार भारती ठाणे महानगर समितीच्या नृत्य विभाग प्रमुख अपर्णा बेडेकर यांना विशेष आमंत्रित केलं होतं. स्पर्धा संपल्यावर विद्यार्थ्यांना आपले कलागुण उत्तम सादर करण्यासाठी त्यांनी अनेक छोट्या टीप्स दिल्या. स्वतः नृत्य करून मुलांना मार्गदर्शन केलं. याला विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. त्यांच्याबरोबर वंदना नाईक आणि स्वाती जोशी यांनी परीक्षणाचं काम केलं. सराव स्पर्धांमधील विजयी स्पर्धकांना बक्षीसं देऊन स्नेहसंमेलनाची यशस्वी सांगता झाली.







हे संमेलन यशस्वी करण्याकरता विद्यार्थी प्रतिनिधी मंडळांनी अतिशय मोलाची कामगिरी केली. अतिशय कमी वेळात सर्व स्पर्धांचे उत्तम आयोजन केलेल्या विद्यार्थ्यांची नावे:

जनरल सेक्रेटरी: चैतन्य विशे, ऋतुजा पाठक, आझका दळवी, स्वस्तिक क्षीरसागर.

असिस्टंट जनरल सेक्रेटरी: ऋतुजा गडकरी, सुचित्रा वेमुला, रोशन थोरात, दिशा मिश्रा, शावक चिन्ह, हर्षदा साळुंखे, समृद्धी हेदूळकर, श्रद्धा चव्हाण, ईशा महाजन दिव्य.

कॉर्डिनेटर्स: अनुजा अधिकारी, आर्य पवार, आयुष तलवार, समर्थ भिरूड, चाणक्य बेलूरकर, तनिष्क जगताप, जयंत केळी, प्रगती सोनावणे, भावेश आडेपगार, ईश्वरी शिंदे, तनिष्का गाडी, मित देसले, पार्थ रोकडे.

**विविध स्पर्धांमधील यशस्वी विद्यार्थी :–**

**मेहंदी कॉम्पिटिशन –** प्रथम : भावेश आडेपवार
द्वितीय : दिशा निरभवाने
तृतीय : मानसी सुतार

**ड्रॉइंग कॉम्पिटिशन –** प्रथम : साक्षी जाधव
द्वितीय : नीतिन जाधव
तृतीय : ऋतुजा सरगार

**रांगोळी कॉम्पिटिशन –** प्रथम : मानसी भोसले
द्वितीय : दिशा निरभवाने

**‘बॉलीवूड डे आणि रॅम्प वॉक’**
प्रथम : ऋतुजा पाठक
द्वितीय : दिव्यांका पाटील

**‘बॉलीवूडक्विज कॉम्पिटिशन’**
प्रथम : आदेश गव्हाने
द्वितीय : श्रेयस पानसरे

**साडी क्वीन –** सिमरन कांबळे

**टाय किंग –** शावक चेन्ना

**उत्तेजनार्थ –** राजलक्ष्मी पाटील, मनीष राजे

**गायन स्पर्धा –** प्रथम : आदेश गव्हाने
द्वितीय : समृद्धी हेदूळकर

**नृत्य स्पर्धा –** वैयक्तिक : प्रथम : मनस्वी आजीवले
द्वितीय : शिवम जाधव

**सामूहिक –** प्रथम : दर्शन पाटील, माहेश्वरी पेंडेकर
द्वितीय : साक्षी मोर, प्राप्ती राणे, सतीश सावंत, रोहित सावळे, तुषार सावळे आणि चीसाब परमार

दिनांक ९ जानेवारी २०२४ रोजी "Capacity Building Faculty Orientation, K Scheme" या विषयांतर्गत कार्यशाळेचे आयोजन केले. २०२३ सालापासून महाराष्ट्र बोर्ड तंत्रनिकेतनाने सुधारित शिक्षणप्रणाली नुसार (NEP 2020) "K" Scheme चा प्रथम सत्राचा अभ्यासक्रम सुरू केला.



शिक्षकांना "K" Scheme च्या द्वितीय सत्राच्या अभ्यासक्रमाची रूपरेषा व सादरीकरण यासाठी ह्या कार्यशाळेचे आयोजन केले. IKS (Indian Knowledge System) चा अभ्यासक्रमामध्ये समावेश हे अभ्यासक्रमाचे वैशिष्ट्य आहे. सदर अभ्यासक्रम हा प्रामुख्याने "Industry" च्या गरजेनुसार करण्यात आला आहे. द्वितीय अभ्यासक्रमात विद्यार्थ्यांना सामाजिक जाणीव, पर्यावरणाविषयी जागृती, संस्कार, आर्थिक नियोजनाचे विविध उपाय या विविध बाबींसाठी "Social & life skills" या विषयाचा समावेश केला आहे.



सदर कार्यशाळेसाठी NTTTRC (भोपाळ) कडून डॉ. संदीप केदार व डॉ. विजय पाटील यांनी सुधारित शिक्षण प्रणाली, "K" Scheme ची वैशिष्ट्ये व ती राबविण्यासाठी करण्यात आलेली पद्धत यासंदर्भात विस्तृत मार्गदर्शन केले. उपस्थित शिक्षकवर्गाने आपल्या शंकेचे निरसन विविध प्रश्न विचारून केले. प्रो. प्रदीप चव्हाण यांनी "Social & Life Skills" या विषयाचा सहभाग कोणत्या व कशा प्रकारे करायचा या विषयी मार्गदर्शन केले.

कार्यशाळेला प्रो.एन.व्ही. मातोलकर (Assistant Secretary, मुंबई विभाग) व सौ. निशा वरथा (System Analyst) यांचे मार्गदर्शन लाभले.



कार्यशाळेचे आयोजन ''पाणिनी सभागृहात'' केले; सिंधूदुर्ग, रत्नागिरी, पालघर, नवी मुंबई, ठाणे, मुंबई अशा विविध विभागांतून शिक्षकांची उपस्थिती कार्यशाळेला होती.

---

तुमचे सौख्य तुमच्या विचारांवर अवलंबून असते.



**डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था, ठाणे**

२ डिसेंबर : सहा. प्रा. संदीप मोघे, सहा. प्रा. कृष्णकांत लसुणे व सहा. प्रा. प्रथमेश तावडे यांनी १ आणि २ डिसेंबर २०२३ रोजी एमईटी इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट, वांद्रे (प.) येथे आयोजित 'व्यवस्थापन संशोधनातील कृत्रिम बुद्धिमत्तेची भूमिका' या विषयावरील दोन दिवसीय आंतरराष्ट्रीय संशोधन परिषदेत. 'टू स्टडी द इम्पॅक्ट ऑफ जनरेटिव्ह ए आय ॲडव्हर्टीसमेन्ट ऑन द बिहेविअरल इंटेन्शन ऑफ कंझुमर' या शोधनिबंधाच्या सादरीकरणासाठी द्वितीय क्रमांक मिळविला.




५ डिसेंबर : डॉ. पल्लवी चंदवासकर यांची सेज (SAGE) प्रकाशन संस्थे तर्फे स्कोपस (SCOPUS) अनुक्रमित, एशियन जर्नल ऑफ मॅनेजमेंट केसेस या नियतकालिकाच्या समीक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली आणि त्यांनी त्यातील केस स्टडीचे समीक्षण यशस्वीरीत्या पूर्ण केले.

७ डिसेंबर : डॉ. नीतिन जोशी यांनी दि. ७ व १४ डिसेंबर २०२३ रोजी विद्यार्थी आणि प्राध्यापकांचे विक्री कौशल्य वाढविण्यासाठी 'सेलिंग मेड इंटरेस्टिंग' या विषयावर एक यशस्वी कार्यशाळा आयोजित केली.




१६ डिसेंबर : 'ब्रिम्स' ने विद्या प्रसारक मंडळाची व्यवस्थापन शिक्षणातील ५० वर्षे साजरी केली. प्रमुख पाहुणे, आय.आय.एम., मुंबई चे डॉ शंकर मूर्ती यांच्या हस्ते या कार्यक्रमाचे उद्घाटन झाले व त्यांनी उपस्थितांना संबोधित केले. या सुवर्णमहोत्सवाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांनी अनेक नावीन्यपूर्ण खेळ आणि खाद्यपदार्थांच्या विक्री केंद्रांसह व्यवस्थापन मेळावा आयोजित केला होता,




दिवसाची सांगता संगीत संध्या आणि ५० वर्षांच्या प्रवासात योगदान दिलेल्या भागधारकांच्या सत्कार समारंभाने झाली.









२२ डिसेंबर : 'ब्रिम्स' तर्फे शार्प कन्सल्टन्सीच्या सहकार्याने एचआर नेटवर्किंगसाठी एक कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यामध्ये डॉ. कांचन आणि डॉ. श्रीपाद बापट यांनी एचआर व्यावसायिकांसाठी एम्ब्रेसिंग चेंज: इक्किपिंग एचआर प्रोफेशनल्स फॉर इफेक्टिव्ह चेंज मॅनेजमेंट या विषयावर एक सत्र आयोजित केले.






२७ डिसेंबर : सहा. प्रा. संदीप मोघे यांनी असोसिएशन ऑफ इंडियन मॅनेजमेंट स्कूल्स (AIMS) द्वारे आयोजित 'टेक्नोलोजि अँड मॅनेजमेंट एज्युकेशन - इम्प्लिकेशनस फॉर करिक्युला मॅनेजमेंट' या सत्रात सहभाग घेतला.




३० डिसेंबर : डॉ. पल्लवी चंदवासकर यांनी 'व्यावसायिक नैतिकता आणि शाश्वतता' या विषया वरील एआयसीटीइ (AICTE) एनआयटीटीआर (NITTTR) मॉड्यूल २ चे विद्याशाखा विकास मॉड्यूल आणि संप्रेषण कौशल्ये, प्रकार आणि ज्ञान प्रसार यावरील मॉड्यूल ३ यशस्वीरीत्या पूर्ण केले.







९ डिसेंबर : एमएमएस २०२२-२४ तुकडीचे विद्यार्थी श्री. साहिल संजय उत्तेकर आणि श्री. निखिल साखरकर यांनी महाराष्ट्र राज्य नवोपक्रम मंडळाने आयोजित केलेल्या महाराष्ट्र राज्य इनोव्हेशन चॅलेंज स्पर्धेत भाग घेतला आणि जिल्हा स्तरावर १७ गटांमधून त्यांची निवड झाली व त्यांना त्यांच्या बिझनेस मॉडेलचे सादरीकरण करण्याची संधी मिळाली.

**महर्षी परशुराम अभियांत्रिकी महाविद्यालय, वेळणेश्वर**

दिनांक १४ डिसेंबर २०२३ रोजी महाविद्यालयातील विद्युत अभियांत्रिकी विभाग आणि संस्था इनोव्हेशन कौन्सिलच्या वतीने ऊर्जा संवर्धन दिन निमित्त 'ऊर्जा संवर्धन' या विषयावर कनिष्ठ विज्ञान महाविद्यालय पालशेत येथील अकरावी आणि बारावी विज्ञान शाखेच्या विद्यार्थ्यांसाठी चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. या सेमिनारसाठी कनिष्ठ विज्ञान महाविद्यालयाचे एकूण ४५ विद्यार्थी उपस्थित होते. प्रा. प्रीती साठे आणि प्रा. साक्षी तांबे या परिसंवादासाठी संसाधन व्यक्ती होत्या. परिसंवाद दोन सत्रात विभागला गेला. यावेळी, 'आपण ऊर्जा संवर्धन दिन का साजरा करतो, ऊर्जा म्हणजे काय, ऊर्जेचे प्रकार' इत्यादींबद्दल त्यांनी विद्यार्थ्यांना माहिती दिली. प्रा. साक्षी तांबे यांनी ऊर्जा कशी वाचवायची आणि आपण उर्जेचे संवर्धन का केले पाहिजे यावर चर्चा केली.




दिनांक ०७ डिसेंबर ते ०९ डिसेंबर या कालावधीत महाविद्यालयाच्या विद्युत अभियांत्रिकी आणि स्थापत्य अभियांत्रिकी विभागातर्फे अलोरे येथील कनिष्ठ महाविद्यालयात आयोजित तीन दिवसीय विज्ञान प्रदर्शनात एकूण ३ प्रकल्पांनी सहभाग घेतला. परशुराम एज्युकेशन सोसायटीच्या कनिष्ठ महाविद्यालय, अलोरे येथे विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. या विज्ञान प्रदर्शनात सहभागी होण्याचे आवाहन अलोरे कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य श्री. वाचसिद्ध सर यांनी केले होते. त्या आवाहनाला प्रतिसाद म्हणून अलोरे येथील विज्ञान प्रदर्शनात महर्षी परशुराम अभियांत्रिकी महाविद्यालयातील एकूण ३ (इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंगचे २ आणि स्थापत्य अभियांत्रिकीचे १) प्रकल्प सादर करण्यात आले. या उपक्रमासाठी अभियांत्रिकी महाविद्यालयाचे सहायक प्राध्यापक श्री. योगेश काटदरे (विद्युत विभाग) व सौ.भक्ती घोरपडे (स्थापत्य विभाग) यांनी पुढाकार घेतला. यावेळी वायरलेस इलेक्ट्रिक पॉवर ट्रान्सफर आणि आय ब्लिंक सेन्सरचा वापर करून अपघात प्रतिबंध असे दोन प्रकल्प विद्युत अभियांत्रिकी विभागाकडून ठेवण्यात आले होते. स्थापत्य अभियांत्रिकी विभागाने जगन्नाथ मंदिराची प्रतिकृती ठेवली होती. विज्ञान प्रदर्शनात सहभागी झालेले सर्व विद्यार्थी आणि त्यांच्या शिक्षकांनी वरील तीनही प्रकल्प उत्साहाने पाहिले. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून समाजातील विविध घटकांचे जीवन सुसह्य करणे हे कोणत्याही प्रकारच्या अभियांत्रिकी शिक्षणाचे मूलभूत मूल्य आहे आणि ते शालेय जीवनापासूनच विद्यार्थ्यांमध्ये रुजवणे हा महर्षी परशुराम अभियांत्रिकी महाविद्यालयाचा मुख्य हेतू होता. या विज्ञान प्रदर्शनात हजारो विद्यार्थ्यांनी मोठ्या आवडीने हे प्रकल्प पाहिले.

या विज्ञान प्रदर्शनाच्या उद्घाटन प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून चिपळूणचे तहसीलदार श्री. प्रवीण लोकरे उपस्थित होते. याशिवाय गटशिक्षणाधिकारी, शिक्षण विस्तार अधिकारी, विविध नामांकित शाळा व महाविद्यालयांचे प्राचार्य, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आणि हजारो विद्यार्थी या संपूर्ण कार्यक्रमात उत्साहाने सहभागी झाले होते. या संपूर्ण प्रदर्शनात महर्षी परशुराम अभियांत्रिकी महाविद्यालयाने सादर केलेले वरील तीनही प्रकल्प सर्वांचे लक्ष वेधून घेत होते. प्रस्तुत उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी महर्षी परशुराम अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नरेंद्र सोनी, तसेच अलोरे कनिष्ठ महाविद्यालयाचे

प्राचार्य श्री वाचसिद्ध सर यांनी मार्गदर्शन केले. तसेच यावेळी महाविद्यालयाचे सहाय्यक प्राध्यापक श्री.योगेश काटदरे व सौ. भक्ती घोरपडे यांनी हा संपूर्ण उपक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी विशेष परिश्रम घेतले.



महाविद्यालयाच्या विद्युत अभियांत्रिकी विभागातर्फे विशेष वैज्ञानिक चर्चासत्राचे आयोजन शिरगाव येथील रयत शिक्षण संस्थेच्या कनिष्ठ महाविद्यालयात करण्यात आले होते. 'ब्लॅक होल्सची जादू' हा या चर्चासत्राचा विषय होता. यावेळी येथील अकरावी व बारावीच्या विज्ञान शाखेच्या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. आपल्या जगात आणि वैज्ञानिक क्षेत्रात घडणाऱ्या अनेक घटना तसेच भौतिकशास्त्र आणि खगोलशास्त्र या विषयांमध्ये दडलेली अनेक अविश्वसनीय, रोमांचक आणि गूढ रहस्ये विद्यार्थ्यांनी त्यांच्या वयातच समजून घ्यावीत आणि त्यांच्यात प्रबोधन करावे, हा या चर्चासत्राचा मुख्य उद्देश होता. महाविद्यालयाच्या विद्युत अभियांत्रिकी विभागातील सहायक प्राध्यापक श्री. योगेश काटदरे हे या विषयाचे अतिथी व्याख्याते म्हणून उपस्थित झाले होते.

या चर्चासत्रात श्री. काटदरे यांनी कृष्णविवर म्हणजे नेमके काय, कोणत्याही तारेचे कृष्णविवरात रूपांतर कसे होते, कृष्णविवरातून प्रकाश किरणही का सुटू शकत नाहीत, कृष्णविवराची संकल्पना सर्वप्रथम मांडणाऱ्या व कृष्णविवर अशा अनेक विषयांवर सविस्तर मार्गदर्शन केले. या चर्चासत्रासाठी शिरगाव ज्युनिअर कॉलेजच्या अकरावी व बारावी विज्ञान शाखेच्या एकूण ८४ विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग घेतला. हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी शिरगाव कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य श्री. बी. व्ही. बिद्रीकोठीमठ सर, तसेच त्यांचे विज्ञान शिक्षक श्री. जाधव सर, पवार सर, सनदी मॅडम यांनी विशेष सहकार्य केले. तसेच हा कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडल्याबद्दल विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. विजय बेडेकर, महर्षी परशुराम अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नरेंद्र सोनी, तसेच विद्युत अभियांत्रिकी विभागाचे प्रमुख श्री. सतीश घोरपडे व पब्लिसिटी समितीचे प्रमुख डॉ. गणेश दिवे यांनी विशेष मार्गदर्शन केले.





•••

Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006

# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

- अत्याधुनिक दृक् श्राव्य यंत्रणा
- वातानुकूलित प्रसन्न वातावरण
- वाहने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा

अशा सुविधांनी युक्त

| सभागृहाचे नाव | ठिकाण | आसन क्षमता |
|---|---|---|
| थोरले बाजीराव पेशवे सभागृह | महाविद्यालय परिसर | ३०० |
| कात्यायन सभागृह | कला/वाणिज्य इमारत | १६० |
| पातंजली सभागृह | बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय इमारत | १६० |
| पाणिनी सभागृह | डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था इमारत | १८० |
| मनु सभागृह | वि. प्र. मं. चे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय इमारत | २५० |

**❉ संपर्क ❉**

कार्यवाह

## विद्या प्रसारक मंडळ

विष्णूनगर, नौपाडा, ठाणे - ४०० ६०२

दूरध्वनी क्रमांक - २५४२६२७०

Email : vpmt1935@gmail.com

हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिण्टस्, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे - ४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे-४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे - ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.